## सुविचार

इस संसार में दूसरों की लोभ– वृत्ति के कारण बहुत से लोग भूखे मरते हैं । यदि हम बाँटना सीख लेते तो यह समस्या हल हो गयी होती ।

(ब्रह्मकुमारीज)


विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. २२ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२८ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# सेलममध्ये मोदिंनी फोडला प्रचाराचा नारळ



चेन्नई : लोकसभा निवडणुकीत ‘४०० पार’ चा नारा दिलेल्या भाजपने दक्षिणेतही लक्ष घातले आहे. तामिळनाडूमध्ये यंदा किमान पाच जागा जिंकण्याचा भाजपचा संकल्प आहे. त्यासाठी पक्षाने कोंगू मंडलम प्रांतात जोर लावला आहे. अण्णा द्रमुकचा हा बालेकिल्ला आहे. २०२१ च्या विधानसभेला भाजपने येथूनच दोन जागा जिंकल्या. पीएमकेचा एनडीएत समावेश झाल्याने येथे भाजपला लाभ होण्याची आशा आहे.

तामिळनाडूच्या वायव्येला व कर्नाटकलगत असलेल्या कोंगू प्रांतात हिंदुत्ववादी राजकारणाला पूर्वीपासूनच समर्थन मिळत आले आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोईम्बतूर, सेलम येथून प्रचारास प्रारंभ केला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यभरात द्रमुकची लाट असतानादेखील कोंगू प्रांताने अण्णा द्रमुकला साथ दिली होती. त्यावेळी ३० पेक्षा अधिक जागा अण्णा द्रमुकने जिंकल्या होत्या.

२०१९ मध्ये कोणाला किती मते?

एकूण जागा ३८

द्रमुक २३, काँग्रेस ८, सीपीआय २, सीपीआय (एम) २, आयएमएल १, अन्य २, तिरंगी लढतीत लॉटरीची संधी

सत्ताधारी द्रमुक, विरोधी अण्णा द्रमुक आणि एनडीए अशा तिरंगी लढतीत कोंगू प्रांतातील काही जागांवर भाजपला विजय मिळू शकतो, असा

(पान ७ वर)

## मोफत आश्वासनांना चाप लागणार

नवी दिल्ली : निवडणुकांदरम्यान राजकीय पक्षांतर्फे मते मिळविण्यासाठी दिल्या जाणा-या आश्वासनांच्या रेवडी संस्कृतीला लगाम लावण्याची मागणी करणा-या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर राजकीय पक्ष जाहीरनाम्यांना अंतिम स्वरूप देत असतानाच गुरूवार दि. २१ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयाने इशारा दिला.

या प्रकरणावर तीन सदस्यीय पीठाची कालच चर्चा झाली, असे सांगत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी या याचिकेवर सुनावणी करण्याचे मान्य केले. प्रत्येक (पान ७ वर)

# काँग्रेसची खाती गोठवली



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकांची सर्व पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेसनेही तयारी सुरू केली आहे. काही दिवसापूर्वी काँग्रेसच्या बँक खात्यांवर कारवाई झाली असून काँग्रेसची खाती गोठवली आहेत. याबाबत आज काँग्रेसने दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले आहेत. या निवडणुकीत आम्ही प्रचारहि करु शकत नाही, आमचे नेते प्रवासही करु शकत नाहीत. रेल्वे तिकीटासाठीही पैसे नाहीत, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

आज दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, अजय माकन उपस्थित होते. यावेळी बोलताना राहुल गांधी म्हणाले, विना बँक खाते आम्ही निवडणूक कशी लढणार, जर तुमच बँक खाते बंद केले, एटीएम बंद केले तर तुम्ही जगणार कसे? आम्ही ना प्रचार करु शकतो, ना प्रवास करु शकतो, ना नेत्यांना पैसा देऊ शकतो, असेही राहुल गांधी म्हणाले.

काँग्रेसला निवडणूक लढवू द्यायची नाही

निवडणुकीच्या दोन महिने आधी काँग्रेसच्या बँक खात्यावर कारवाई करणे म्हणजे काँग्रेसला निवडणूक लढवूच द्यायची नाही, एक महिन्यापूर्वी काँग्रेसची सर्व खाती फ्रीज केली आहेत. काँग्रेससोबतच अन्याय सुरू आहे. निवडणूक आयोग यावर शांत आहे. आम्हाला २० टक्के मतदान करतात, सर्व संस्थात्मक संघटना शांत आहेत असेही राहुल गांधी म्हणाले.

देशात लोकशाही नाही

देशात लोकशाही आहे हे खोटे आहे, आमची बँक खाती गोठवली नाही तर लोकशाही गोठवली आहे. सात वर्षां आधी १४ लाखांचा मुद्दा आहे, १० हजार रुपयांचा दंड असायला हवा होता आज ते २०० कोटी वसूल करत आहेत असेही राहुल गांधी म्हणाले.

# मुख्यमंत्री केजरीवाल यांना अटक



नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून अटक करण्यात आली असून केजरीवाल यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीचे (ईडी) पथक त्यांच्या निवासस्थानी सायंकाळी पोहोचले होते. दिल्लीचे मद्यविक्री धोरण लागू करताना आर्थिक गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याच आरोपांप्रकरणी केजरीवाल यांना ईडीने याआधी अनेकवेळा समन्स जारी केलेले आहे. मात्र यावेळी ईडीचे पथक थेट केजरीवाल यांच्या निवासस्थानी धडकले. त्यामुळे केजरीवाल यांना अटक होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता असे असताना केजरीवाल यांना रात्री ९ वाजता अटक करण्यात आली आहे.

दिल्ली मद्यविक्री धोरण घोटाळा प्रकरणी अटकेपासून सुरक्षा मिळावी यासाठी केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने केजरीवाल यांना अटकेपासून अंतरिम सुरक्षा देण्यास नकार दिला. यासह न्यायालयाने ईडीला केजरीवाल यांनी दाखल केलेल्या नव्या याचिकेवर उत्तर दाखल करण्याचा आदेश दिला. तसेच या प्रकरणावर पुढील सुनावणी २२ एप्रिल रोजी होईल असे सांगितले. न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे केजरीवाल यांच्यासाठी चांगलाच धक्का असल्याचे मानले जात आहे. याच निकालानंतर आता ईडीचे पथक थेट केजरीवाल यांच्या निवासस्थानी धडकले होते.

# चीनमध्ये मोठा आर्थिक घोटाळा

बीजिंग : चीनमधील रिअल इस्टेट क्षेत्रातील बलाढ्य कंपनी एव्हरग्रेंडमध्ये ७८ अब्ज डॉलरचा महाघोटाळा उघडकीस आला असून हा चीनमधील आतापर्यंतचा सर्वांत मोठा घोटाळा ठरला आहे. या घोटाळ्यामुळे चिनी अर्थव्यवस्थेला मोठा झटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.





प्राप्त माहितीनुसार, एव्हरग्रेंडचे संस्थापक आणि चेअरमन शू जियायीन यांनी कागदोपत्री हेराफेरी करून कंपनीचा महसूल तब्बल ७८ अब्ज डॉलरने वाढवून दाखविला. खोट्या उत्पन्नाच्या आधारावर कंपनीने आपले रोखे चढ्या भावाने विकले. आता हे रोखे खरेदीदार अडचणीत आले आहेत.

३०० अब्ज डॉलर्सचे कर्ज

एव्हरग्रेंड ही जगातील सर्वाधिक कर्जात बुडालेली कंपनी आहे. (पान ७ वर)

# विकसित भारतचे संदेश बंद करा





नवी दिल्ली : लोकांना व्हॉट्सॲपवरुन विकसित भारत नामक जाहिरातीतून मोदींची गॅरंटी आणि मोदींनी केलेल्या कामाची माहिती पोहोचवली जात आहे. सध्या आचारसंहिता लागू झालेली आहे, तरीही व्हॉट्सॲपवर सरकारी जाहिराती येत असल्याने याबाबतच्या अनेक तक्रारी निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे आयोगाने या जाहिराती व्हॉट्सॲपवरुन पाठवणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

निवडणूक आयोगाने गुरुवारी सांगितले की, आयोगाने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला निर्देश दिले आहेत की, जनतेच्या व्हॉट्सॲपवर पाठवण्यात येणारे विकसित भारतचे मेसेज तातडीने थांबविण्यात यावेत. तसेच आयोगाने आयटी मंत्रालयाकडून या प्रकरणाचा अनुपालन अहवालही मागवला आहे. दरम्यान, आयोगाने सांगितले की, याबाबत आमच्याकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामध्ये त्यांनी म्हटले की, सध्या देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झालेली असतानाही लोकांच्या फोनवर सरकारी जाहिरातीत पाठवल्या जात आहेत.

मॅसेज आचारसंहितेपूर्वीचे?

निवडणूक आयोगाच्या आदेशाला उत्तर देताना आयटी मंत्रालयाने (पान ७ वर)

# मनसे धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढणार?



मुंबई : लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेंचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष एकनाथ शिंदेंच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. म्हणजे राज ठाकरेंच्या मनसे पक्षाचा उमेदवार धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढू शकतो. मुंबईत राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात बैठक झाली. ताज हॉटेलमध्ये पार पडलेल्या या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

मुंबईत सध्या वेगवान घडामोडी घडत आहेत. मनसे आणि महायुतीमध्ये रोज बैठका होत आहेत. नुकतेच राज ठाकरे मंगळवारी दिल्ली दौ-यावर गेले होते. यावेळी त्यांनी विनोद तावडे तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. यावेळी राज ठाकरे यांच्यासह त्यांचे चिरंजीव अमित ठाकरेही उपस्थित होते. यादरम्यान काय चर्चा झाली याचा खुलासा दोन्ही पक्षांनी केला नव्हता. एक ते दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल असे सांगण्यात आले होते.

दिल्लीत राज ठाकरे आणि अमित शहा यांच्यात बैठक झाली. अमित ठाकरेही सोबत होते. महायुतीत सहभागी होण्यासंबंधी दोघांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. आणखी एका बैठकीनंतर यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. सध्या सकारात्मक चर्चा झाली इतकंच सांगू शकतो, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली होती.

लोकसभा निवडणूक असल्याने त्यासंदर्भातच चर्चा झाली. आम्ही कोणताही फॉर्म्युला दिलेला नाही, पण नेमक्या किती जागा मिळाव्यात ही भावना सांगितली आहे. भाजपाला सांगण्यता आले असून एक-दोन दिवसांत माहिती आल्यानंतर सविस्तर सांगू, असे बाळा नांदगावकर यांनी सांगितले होते.

मनसेला किती जागा मिळणार?

सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीमध्ये मनसेला लोकसभेच्या दोन जागा मिळण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबई आणि शिर्डी या दोन लोकसभेच्या जागा मनसेला दिल्या जाऊ शकतात. विशेष म्हणजे या निवडणुकीतून अमित ठाकरे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबईतून तरुण आणि सुशिक्षित चेहरा असावा यासाठी अमित ठाकरे यांनी निवडणूक लढवावी असा भाजपचा आग्रह आहे. तसे झाल्यास अमित ठाकरे निवडणूक लढताना दिसतील. दरम्यान (पान ७ वर)

# प्रचारादरम्यान योग्य भाषा वापरा मुखमंत्री शिंदेचे आवाहन

मुंबई : लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. ज्यामुळे आता सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्यांकडून पदाधिकारी, नेतेमंडळी आणि प्रवक्त्यांच्या बैठका घेण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (ता. २१ मार्च) वरळी डोम येथे पदाधिकारी, प्रवक्ते आणि पक्षातील प्रमुख नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी उपस्थित असलेल्या पदाधिका-यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. विरोधकांवर टीका करा, पण टीका करताना खालच्या पातळीवर जाऊन टीका करू नका, अशी सूचना मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आली आहे.

आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला पक्षातील प्रवक्ते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नेते उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एका ठिकाणच्या आरोप-प्रत्यारोपांचे पडसाद सर्वत्र उमटतात. पक्षाची जी भूमिका आहे त्याच्या विरोधात कुणालाही जाता येणार नाही. आपण मराठा आरक्षण दिले आहे. कोर्टात टिकणारे आरक्षण आहे. पोलिस भरती या आरक्षणानुसार होत आहे. मराठा समाजाला न्याय दिला. ओबीसींवर अन्याय केला नाही. ही सर्व कामे लोकांपर्यंत पोहोचवा.



तसेच, विरोधक खालच्या पातळीवर टीका करत आहेत. पण आपण आपली पातळी सोडायची नाही. शिव्याशाप द्यायचे नाहीत. विरोधकांना एक्स्पोज करा. हिंदुत्व सोडले, बाळासाहेबांचे विचार सोडले. शिवाजी पार्कला हिंदू बांधव-भगिनी म्हणायची त्यांना लाज वाटली. २०१९ सालापासून ते बाळासाहेबांच्या इच्छेविरुध्द वागत आहेत, हे सांगा. पण तुम्ही खालच्या पातळीवर विरोधकांवर टीका करू नका. त्यांचा खरा चेहरा समोर आणा, सरकारने केलेली कामे मुद्देसूद मांडा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून करण्यात आल्या आहेत.

त्याशिवाय, निवडणुकीकरिता मध्यवर्ती कार्यालयात २४ तास कार्यरत राहणे, प्रत्येक विधानसभा क्षेत्रात कार्यालय कार्यान्वित करून कामाला सुरुवात करणे, विधानसभानिहाय बैठका घेणे, शाखा-शाखांशी संपर्क ठेवावा, महायुतीच्या स्थानिक नेतृत्वाशी संपर्क व समन्वयक ठेवावा. त्यांच्या बैठका घ्याव्यात. संयुक्त मेळावे घ्यावेत, संयुक्त प्रचार करावा, चौक सभा, संयुक्तपणे घरोघरी प्रचार करणे, यांसारख्या सूचना लोकसभा निरीक्षकांना करण्यात आल्या आहेत.

प्रत्येक वोटिंग स्लिप वाटण्यात याव्या. मोठ्या सभा, रॅली यासाठी समन्वयाने काम करावे. प्रचार साहित्यावर प्रोटोकॉलनुसार स्थानिक पदाधिका-यांची नावे, फोटो याचा वापर करावा. प्रचार आणि सभांच्या (पान ७ वर)

# भारतातील १ टक्के नागरिकांकडे ४० टक्के संपत्ती

नवी दिल्ली : भारतीय लोकांची संपत्ती दिवसेंदिवस वाढत असली तरी मोठ्या प्रमाणात असमानता देखील वाढत आहे. श्रीमंत अधिकच श्रीमंत होत आहे तर गरिब अधिकच गरिब होत असल्याचे चित्र सध्या देशात दिसत आहे. देशातील आर्थिक असमानतेबाबतचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये याबाबतची माहिती देण्यात आली. यामध्ये दिलेल्या माहितीनुसार देशातील फक्त १ टक्के लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती आहे. म्हणजे उपरलेल्या ९९ टक्के लोकसंख्येकडे ६० टक्केच संपत्ती आहे.

सन २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तिंच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. भारतात आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसून येत असून देशातील १ टक्के लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती असल्याचे अहवालातून समोर आले आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसार २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तिंच्या संपत्तीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढली. २०२२-२३ मध्ये देशातील १ टक्के लोकसंख्येच्या संपत्तीत २२.६ टक्क्यांची वाढ झाली. दरम्यान, आर्थिक बिषमतेसंदर्भातील अहवाल थॉमस पिकेट्टी (पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स), लुकास चॅन्सेल (हार्वर्ड केनेडी स्कूल) आणि नितीन कुमार भारती (न्यूयॉर्क विद्यापीठ) यांनी तयार केला आहे.

(पान ७ वर)

# जागतिक वन दिनी जिल्हाधिकारी रमल्या फुलांच्या-पक्षांच्या सान्निध्यात



लातूर, दि. २१ : जागतिक वन दिनानिमित्त वन विभागाने आयोजित केलेल्या वन सफरीत सहभागी होत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे फुलांच्या, पक्षांच्या सान्निध्यात रमून गेल्या. यावेळी त्यांनी तीन तास वन सफर करीत साखरा उद्यानातील वृक्ष, पक्षी यांची माहिती जाणून घेतली.

सहायक वनसंरक्षक वृषाली तांबे, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, वनपरीमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, जैवविविधता समिती सदस्य शहाजी पवार, पक्षीमित्र राहुल जवळगे यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील या जैवविविधतेचे जतन संवर्धन करण्याबाबत त्यांनी वनाधिकारी व जैवविविधता समिती सदस्यांशी जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी मनमोकळा संवाद साधला. सर्वसाधारणपणे पक्षी व वन्यजीवांच्या निरीक्षणासाठी सूर्योदयाची वेळ योग्य असते, हे जाणून जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे ह्या सकाळीच साखरा उद्यानात दाखल झाल्या. यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. साखरा व अंकोली येथील वनक्षेत्राची जिल्हाधिकारी यांनी पहाणी केली. माळरानावरील जैवविविधता, विविध वन्यप्राण्यांच्या पावलांचे ठसे त्यांनी पाहीले.

वन्यजीवांसाठी तयार करण्यात आलेले कृत्रीम पाणवठे, तसेच शिकारी पक्षाच्या प्रजातीबाबत माहिती त्यांनी जाणून घेतली. वनपरीक्षेत्रात लावण्यात आलेली झाडे (पान ७ वर)

# काँग्रेसची यादी जाहीर लातूर डॉ. काळगे, सोलापूर प्रणीती शिंदे





नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आज उमेदवारांची यादी जाहीर केली असून, यात महाराष्ट्रातील ७ उमेदवारांचा समावेश आहे. त्यात नांदेडमधून वसंतराव चव्हाण, लातूरमधून डॉ. शिवाजीराव काळगे यांना उमेदवारी जाहीर झाली. यासोबतच सोलापुरातून आमदार प्रणिती शिंदे, पुण्यातून आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाली. यासोबतच कोल्हापुरातून छत्रपती शाहू महाराज, अमरावतीतून बळवंत वानखेडे, नंदूरबारमधून गोवाल पाडवी यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

# निक्षय मित्र बनूया, जिल्हा क्षयरोगमुक्त करूया:जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर, / प्रतिनिधी: आपला जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या मोहिमेत सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. क्षयरुग्णांना पोषणयुक्त आहार उपलब्ध करून देण्यासाठी निक्षय मित्र बनून नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या क्षयरुग्णांसाठी अन्नदाता उपक्रमप्रसंगी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. सांगळे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, नायब तहसीलदार परवीन पठाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

क्षयरुग्णांना मदत करताना केवळ फूड बास्केट (सकस आहार किट) देणे हाच उद्देश नसून निक्षय मित्र बनून त्यांचे मनोबल वाढविणे आवश्यक असलेचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी यापुढे स्वतःचा वाढदिवस निक्षय मित्र बनून अथवा इतर कोणत्याही विधायक उपक्रमात सहभागी होवून साजरा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

क्षयरुग्णांना मोफत उपचारासोबतच, मोफत निक्षय पोषण योजना व लोकसहभागातून प्रथिनेयुक्त आहार देणेसाठी फुड बास्केटचे वितरण करण्यात येत आहे. लातूर जिल्हयात एक हजार ९०० पेक्षा अधिक क्षयरुग्ण उपचार घेत आहेत. सर्वच रुग्णांना मोफत औषधोपचार पुरविला जात असून त्यातील एक हजार ३०० क्षयरुग्णांना सामाजिक संस्था, व्यावसायिक संघटना, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार यांच्यावतीने फूड बास्केट पुरविण्यात आले आहेत. उर्वरित ६०० पेक्षा अधिक रुग्णांना व नवीन निदान होणाऱ्या रुग्णांना फूड बास्केट देण्यासाठी प्रातिनिधिक स्वरुपात कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी २५ रुग्णांना त्यांचे नातेवाईकांमार्फत फूड बास्केट जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.

जिल्ह्यात क्षयरुग्णांसाठी अन्नदाता उपक्रम राबवून गेल्या दहा ते पंधरा दिवसामध्ये १७६ निक्षय मित्र जोडले गेले असून २५० पेक्षा अधिक रुग्णांना फूड बास्केटची मदत केली आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी दिली.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी स्वतः निक्षय मित्र बनून या उपक्रमात सहभाग घेतला आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांना निक्षयमित्र म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले.

# आचार संहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सीव्हिजिल ॲपवर तक्रार करा

## भारत निवडणूक आयोगाने विकसित केला मोबाईल ॲप

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी) - भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचार संहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते. हा सीव्हिजिल ॲप ॲंड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

सीव्हिजिल ॲप हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहिताच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

**वापर कसा करायचा**

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या ॲपमध्ये जावून सीव्हिजिल (cVIGIL) सर्च करावे. त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

**अचूक कृती व देखरेख**

या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

**लाईव्ह फोटो, व्हिडिओ**

या ॲपच्या अचूकतेसाठी ॲपमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हिडिओ घेतले जातात. त्भयामुळे रारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल. तर या ॲपवर तक्रार दाखल होताच भारत निवडणूक आयोग तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# दिशा प्रतिष्ठानच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त लातूरमध्ये मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी- लातूर जिल्ह्यात आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या दिशा प्रतिष्ठानचा चौथ्या वर्धापन दिनानिमित्त मोफत शस्त्रक्रियांचे आयोजन करण्यात आलं आहे. शनिवार २३ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते ०२ या वेळेत नाव नोंदणी केली जाणार असून त्यानंतर मोफत शस्त्रक्रिया सुरु होतील.

या सर्व शस्त्रक्रिया लातूर शहरातील नामांकित खाजगी रुग्णालयात होणार आहेत. २४ मार्च २०२०४ पासून सुरु होणाऱ्या मोफत शस्त्रक्रियामध्ये अँजिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे विविध आजार, ब्रेन ट्युमर आदी १००% मोफत शस्त्रक्रिया औषधांसह केल्या जाणार आहेत. तर ५० % सवलतीमध्ये कान-नाक-घसा, जनरल सर्जरी, स्त्रीरोग शस्त्रक्रिया, हाडांच्या, डोळ्यांच्या शस्त्रकिया केल्या जाणार आहेत. रक्त तपासणी, सिटीस्कॅन आणि एमआरआय ५० टक्के सवलतीत उपलबध करून दिले जाणार आहे.

या सर्व शस्त्रक्रिया लातूर शहरातील सह्याद्री हॉस्पिटल, पोद्दार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सादसुख हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल तर निलंगा येथील गणेश नेत्रालय आदी नामांकीत हॉस्पिटलमध्ये केल्या जाणार आहेत. तत्पूर्वी नाव नोंदणी अत्यावश्यक आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी गरजू रुग्णांनी शनिवार २३ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते ०२ या वेळेत नाव नोंदणी करावी लागणार आहे. नाव नोंदणीची ठिकाणं पुढीलप्रमाणे : लातूर - कोंबडे हॉस्पिटल-५ नंबर चौक, रेणापूर : देशमुख हॉस्पिटल, अहमदपूर - भाऊ हॉस्पिटल, थोडगा रोड, चाकूर - आधार हॉस्पिटल जुन्या बसस्टँड समोर, उदगीर - स्पंदन हॉस्पिटल शेल्हाळ रोड, जळकोट - रुक्मिणी हॉस्पिटल, बस डेपो जवळ, वलांडी - श्रीकृष्ण क्लिनिक दि इंडियन अर्बन बँके जवळ, निलंगा - साई हॉस्पिटल, छत्रपती शिवाजी महाराज चौक, औसा - सह्याद्री हॉस्पिटल,, चखऊ समोर आदी ठिकाणी केली जाणार आहे. या शिबिराच्या अधिक माहितीसाठी दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले (९४२०४३८९९९), इसरार सगरे (९९६०८०३३३३) ॲड. वैशाली यादव (८३६९६५१५९९), जब्बार पठाण (९०२८३४८१११), विष्णू धायगुडे (९६७३४०९७७७), अजय शहा (९८९०८८९९९१) यांच्याशी संपर्क साधता येणार आहे. तर या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. अशोक पोद्दार, अभिजीत देशमुख, डॉ. चेतन सारडा, डॉ. हणुमंत किनीकर, संतोष देशमुख, प्रसाद उदगीरकर, किशोर भुजबळ, रतन बिंदादा, अविनाश कामदार, प्रसाद जोशी, महेश मालपाणी, पप्पु घोलप यांनी केलं आहे.

# जन-जन के लिए प्रेरणा स्त्रोत बनेगी विलक्षण सन्त मौनी जी महाराज का ग्रन्थ - जद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी



वाराणसी/बलिया - तीनों लोकों से न्यारी अविमुक्तक्षेत्र की पावन पवित्र काशी नगरी में रंगभरी एकादशी को पुष्य नक्षत्र के विशिष्ट योग में श्री जगद्गुरु विश्वाराध्या ज्ञान सिंहासन जंगमवाडीमठ, वाराणसी में परम पूज्य श्रद्धेय श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी जी महाराज के सानिध्य में काशी के विशिष्ट विद्वानों के कर कमलों द्वारा प्रेरणा-स्त्रोत: विलक्षण सन्त मौनी बाबा की पुण्य कथा नामक ग्रन्थ के द्वितीय संस्करण को शिवार्पण किया गया। कार्यक्रम में मुख्य वक्ता के रूप में श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी जी महाराज ने बताया कि मौनी जी महाराज असाधारण प्रतिभा धनी एवं उच्च कोटि के साधक सन्तों में अग्रगण्य थे। उनके जीवनी पर आधारित ग्रंथ एवं उनके विशेष विग्रह को देखने से ऐसा लगता है कि ऐसे महापुरुष पृथ्वी पर कभी कभी जनकल्याण के लिए भगवत कृपा से अवतरित होते है। उनके शिष्यों, भक्तों एवं परिवारजनों के विशिष्ट अनुभव के संस्मरणों से आलोकित यह ग्रन्थ निश्र्चित रूप से समाज के लिए प्रेरणादायक सिद्ध होगा। विगत वर्ष २०१७ में श्रीसीताराम आरोग्य सदन द्वारा उनके जीवनी पर आधारित प्रथम संस्करण को प्रकाशित किया गया था जिसे समाज को बहुत प्रेरणा मिली है। इसके सम्पादक श्रीमौनी जी महाराज के पौत्र एवं श्री श्री १००८ श्री मौनी बाबा चैरिटेबल ट्रस्ट न्यास के मुख्य न्यासी डॉ. अभिषेक कुमार उपाध्याय को आशीर्वाद देते हुए शिवशिवा से प्रार्थना करता हूं कि ये ऐसे ही धार्मिक कार्यों में लगे रहे और सन्त महात्मा के जीवनी को प्रकाशित करवाकर समाज कल्याण के लिए बद्ध रहे।यह ग्रन्थ सर्व ग्राह्य है और सभी को इसे बार बार पढ़ना चाहिए। इस अवसर पर श्री मौनी जी महाराज एवं उनके जीवनी पर प्रकाशित ग्रन्थ के विषय में विस्तार से बताते हुए प्रो. सुधाकर मिश्र जी ने बताया कि मौनी जी महाराज महर्षि भृगु जी तपोस्थली बलिया उत्तर प्रदेश में अवतरित हुए थे उन्होंने एक सदगृहस्थ की परम्परा को निर्वहन करते हुए सिद्ध साधक सन्त की स्थिति को प्राप्त कर लिया था। ऐसे महापुरुष विरले ही होते है जो समाज में रहते हुए ऐसी स्थिति को प्राप्त हो जाते है। इस ग्रन्थ में उनके जीवनी पर आधारित ऐसे बहुत से तथ्य मिलेंगे जो समाज के प्रत्येक व्यक्ति को लाभ प्रदान करेगा। उसी क्रम में श्री मौनी महाराज के जीवनी ग्रंथ के मुख्य तत्वों के विषय में चर्चा करते हुए प्रो. कमलाकान्त त्रिपाठी जी कहा कि इस ग्रन्थ का मैंने सांगोपांग अध्ययन किया है और पाया है इसमें एक साधारण व्यक्ति में असाधारण प्रतिभा को निखारने के लिए वे सभी तत्व समाहित है जो उनके जीवन में अत्यधिक आवश्यक है। इसमें उदाहरण स्वरूप ऐसे बहुत से शिष्यों का वर्णन मिलेगा जो महाराज जी के सानिध्य प्राप्त करके अपना जीवन धन्य कर लिए हैं। इस ग्रन्थ में वर्णित तथ्यों को महाराज जी ने अपने जीवन में ठीक प्रकार से सिद्ध किया है जो जनमानस के लिए आज प्रेरणा स्त्रोत बन हुआ है। इस अवसर पर मंच संचालन एवं मौनी जी महाराज के विषय में विशिष्ट ढंग से व्याख्यायित करते हुए प्रेरणा-स्त्रोत: विलक्षण सन्त मौनी बाबा की पुण्य कथा नामक ग्रन्थ के लेखक व संपादक एवं महाराज जी के पौत्र डॉ. अभिषेक कुमार उपाध्याय ने बताया कि यह केवल एक ग्रन्थ मात्र ही नहीं बल्कि मानव जाति के लिए संजीवनी है। इसमें महाराज जी के जीवन में घटित ऐसे बहुत से घटनाओं एवं अनुभवों की चर्या को संस्मरण के साथ संयोजन किया गया है जिसे पढ़कर आज की युवा पीढ़ी को बहुत कुछ सीख मिलेगी। मानव शरीर धारी जीव को वास्तव में जीवित रहने के लिए कौन कौन सी विशेष दिनचर्या एवं नियम विधि की आवश्यकता है उसका सप्रमाण वर्णन किया है। इसके पूर्व वर्ष २०१७ में प्रकाशित प्रथम संस्करण से समाज को बहुत सीख मिली थी उसी स्थिति को विचार करते हुए एवं समाज की मांग को देखते हुए श्री श्री १००८ श्री मौनी बाबा चैरिटेबल ट्रस्ट न्यास द्वारा इस ग्रन्थ के द्वितीय संस्करण को प्रकाशित किया जा रहा है। सभी सम्मानित विद्वतजनों को धन्यवाद देते हुए काशी पण्डित सभा के महामंत्री डॉ. विनोदराव पाठक ने कहा कि हमने जीवन में बहुत से सन्तों एवं महापुरुषों के जीवनी को पढ़ा एवं प्रकाशित करवाया है लेकिन मौनी जी महाराज के जीवनी ग्रन्थ के प्रथम संस्मरण को पढ़कर मुझे बहुत कुछ नया सीखने को मिला है। यह ग्रन्थ बहुत ही सरल एवं सहज वार्ता की तरह जनमानस की भाषा में निबद्ध हुआ है जिसे कम पढ़ा लिखा व्यक्ति जो थोड़ा बहुत भगवान एवं संतों पर श्रद्धा रखता है वह समझकर अपना जीवन परिवर्तित कर सकता है। कार्यक्रम में मुख्य रूप से श्री सुनील मिश्र, डॉ. विमलेश पाण्डेय, श्री राहुल मिश्र एवं सुजीत पाण्डेय सहित श्री श्री १००८ श्री मौनी बाबा चैरिटेबल ट्रस्ट न्यास के न्यासी गण उपस्थित रहे।

# हिंगोलीतील रामेश्वर तांडा हे भूकंपाचे केंद्र

नांदेड(प्रतिनीधी): २१ मार्च रोजी सकाळी ०६:०८:३० वाजता ४.५ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसुन आली. हिंगोली जिल्ह्य़ातील वसमत तालुक्यात असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या उत्तर भागातील रामेश्र्वर तांड्याच्या उत्तर भागात भूकंपाचे केंद्र असल्याचे दिसून आले. याची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.अशी माहिती श्रीनिवास औंधकर, संचालक, एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी दिली.



लगेचच दुसरा हलका धक्का पहिल्या धक्क्यानंतर अकरा मिनिटांनी म्हणजे सकाळी ०६:१९:०५ वाजता ३.६ रिश्टर स्केल चा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसुन आली. मात्र या भूकंपाचे केंद्र तिन किलोमीटर दक्षिणेला असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या रामेश्र्वर तांड्याच्या दक्षिण भागात असल्याचे दिसून आले. याही भूकंपाची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.

मराठवाड्यातील १९९३ च्या भूकंपानंतरचा हा सर्वात मोठा भूकंप आहे. यावेळेस हिंगोली नांदेड परभणी जिल्ह्यातील अनेक ठिकाणी या भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

या भूकंपात कसल्याच प्रकारची जीवित हानी झाली नाही.काही जुन्या घरांना भेगा पडले तर काही कच्चे घराच्या भिंती पडल्याची माहिती समोर येत आहे.

## जाणुन घ्या रिश्टर स्केल

४.० रिश्टर स्केलचा भूकंप हा फक्त एक किलो टन टीएनटी (छोटा अणुबॉम्ब इतकी उर्जा) स्फोटकांच्या समतुल्य असतो, परंतु रिश्टर स्केल हा बेस-१० लॉगरिदमिक स्केल असल्यामुळे, सोडल्या जाणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण त्वरीत वाढते: ५.० तीव्रतेचा भूकंप सुमारे ३२ किलो टन टीएनटी एवढी उर्जा निर्माण करत असते (नागासाकी येथे टाकण्यात आलेल्या अणुबॉम्बची क्षमता एवढी होती ), तीव्रता ६.० च्या भूकंपामध्ये १००० किलो टन तर तिव्रता ७.० च्या भूकंपामध्ये ३२००० किलो टन एवढी प्रचंड उर्जेची निर्मीती होत असते.

आजच्या ०६:०८ वाजताच्या पहिल्या भूकंपामध्ये सुमारे २२ किलोटन उर्जेचे उत्सर्जन झाले म्हणजे छोट्या आकाराचे २२ अणुबॉम्ब एकत्रीत फुटल्याने जेवढी उर्जा निर्माण होईल तेवढे उत्सर्जन दिसुन आले तर नंतरचा अकरा मिनीटांनी झालेल्या भूकंपात हिच तिव्रता अतिशय हलका म्हणजे एका अणुबॉम्बने होणाऱ्या उत्सर्जन पेक्षाही कमी असल्याचे दिसून येईल.

श्रीनिवास औंधकर, संचालक, एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर

# श्रम आणि श्रमिकांचा सन्मान केला पाहिजे :अजित कव्हेकर

लातूर / प्रतिनिधी- भारताला महासत्ता बनवायचे असेल तर आपण सर्वांनी श्रम संस्कृतीची जोपासना करत श्रम आणि श्रमिकांचा सन्मान केला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशाचा विकास जलद साधता येईल असे प्रतिपादन युवा नेते अजितभैय्या पाटील कव्हेकर यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित करियर कट्टा, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर व विश्वकल्याण विचार मंच, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास कार्यसत्र.. एक कदम उद्यमी भारत की और या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य वक्ता डॉ. हरिप्रसाद सोमानी, उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, विश्व कल्याण विचार मंचचे अध्यक्ष धनंजय सूर्यवंशी, करियर कट्टा समन्वयक डॉ. शिवप्रसाद डोंगरे आणि डॉ. मनोहर चपळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

पुढे बोलताना अजितभैय्या पाटील कव्हेकर म्हणाले की, आपण आपल्या शिक्षणाचा उपयोग स्थानिक पातळीवरील लोकांना कसा होईल याचा सातत्याने विचार केला पाहिजे. तसेच अभ्यासामध्ये सातत्य, विश्लेषणशिलता आकलन क्षमता आणि वर्तमान स्थितीचे भान या गोष्टीकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे असेही ते म्हणाले

प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, युवकांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हावे आणि त्यामध्ये उज्ज्वल यश संपादन करावे असेही ते म्हणाले.

यावेळी धनंजय सूर्यवंशी म्हणाले की, युवकांमधील सामर्थ्य भारताला संपूर्ण विश्वात नवीन ओळख मिळवून देऊ शकते. जीवनाचा दृष्टिकोन आणि देशाप्रती असलेली अस्मिता युवकांनी ओळखणे गरजेचे आहे.

प्रमुख वक्ता डॉ. हरिप्रसाद सोमानी म्हणले की, आपणास उद्योगात यश संपादन करावयाचे असेल तर नियोजन महत्त्वाचे असते. आपण अंत:करणातून कार्य करण्याची प्रेरणा स्वतःमध्ये निर्माण केली गेली पाहिजे. कार्य करत असताना स्वतःमध्ये प्रेझेन्स ऑफ माईंड, कॉमन सेन्स असणे आवश्यक आहे. सुख, दुःख, लाभ, हानी, जय आणि पराजय हा येतच असतो. आपण कधीच आपले मनोबल खचू देऊ नये किंवा कसल्याही प्रकारचा न्यूनगंड बाळगू नये या विषयी विविध उदाहरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणले की, विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण असणे आवश्यक आहे. कष्ट आणि प्रात्यक्षिक ज्ञानानेच आपली प्रगती होणे शक्य असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल डोंबे यांनी केले तर आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सोमेश्वर पंचाक्षरी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, शुभम बिराजदार, बालाजी होनराव, कृष्णा कोळी, रंगनाथ लांडगे आणि संतोष येचेवाड यांनी परिश्रम घेतले.

यावेळी महाविद्यालयातील वाणिज्य, समाजकार्य आणि संगणक शास्त्र विभागाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कठोर परिश्रम व योग्य नियोजनातून यशाची भरारी घेणे सहज शक्य: गोविंद शिंदे

लातूर / प्रतिनिधी- इयत्ता ९ वी मधून १० च्या वर्गामध्ये पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा घेण्यात आलेला आहे. या मेळाव्यातून उन्हाळी वर्गाचे नियोजन, मागील वर्षाची यशस्वी परंपरा, चालू वर्षाचे नियोजन आणि त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करणे गरजेचे आहे. अशा पध्दतीने कठोर परिश्रम व योग्य नियोजनातून दैदिप्यमान यशाची भरारी घेणे सहज शक्य होईल असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद विद्यालयात आयोजित इयत्ता ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्यात बोलत होते. यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, उपमुख्याध्यापक अनिल सोमवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचे वर्तन, शिस्त आणि पालकांच्या जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तर प्राचार्य गोविंद शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसाठी १० वी च्या उन्हाळी क्लासेसच्या माध्यमातून करण्यात आलेले नियोजन, नियोजनातून करण्यात आलेली अंमलबजावणी आणि सहशालेय उपक्रम यातून येणारा निकाल, याबाबत पॉवर पॉईंट प्रझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत यांनी केले. पालक मेळाव्याचे सुत्रसंचालन अब्दूल गालिब शेख यांनी केले तर आभार विनोद सूर्यवंशी यांनी मानले. या पालक मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी व्यंकट कांबळे, संगादेव आवस्कर, विनोद सूर्यवंशी, राधा कवरे, गणेश कदम, बाळाराम पिचारे, अरूण काळे, भगतसिंग आर्य, भगवंत कलेढले, शेख अफसर, प्रशांत कांबळे, भागवत ढोक, सूरज सोनटक्के यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी या पालक मेळाव्याला विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. २२ मार्च २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची धाराशिव तालुका कार्यकारिणी जाहीर

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची धाराशिव तालुका कार्यकारिणी जाहीर केली आहे. यामध्ये धाराशिव तालुका सरचिटणीसपदी नवनाथ मारवाडकर यांची तर बेंबळी जिल्हा परिषद गट प्रमुखपदी प्रताप इंगळे यांची तसेच तेर पंचायत समिती गण प्रमुखपदी संजय कन्हेरे यांची निवड दि.२१ मार्च रोजी करण्यात आली आहे.

धाराशिव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते व धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, शहराध्यक्ष सचिन तावडे यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिव शहर कार्याध्यक्ष मनोज मुदगल, सामाजिक न्याय प्रदेश उपाध्यक्ष इंद्रजीत शिंदे, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष महमंद कोतवाल, विद्यार्थी विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने, तुळजापूर विधानसभा उपाध्यक्ष जुबेर फकीर, धाराशिव तालुका सरचिटणीस प्रकाश बालकुंदे, अतिश मरगने, अंबेजवळगा जि.प. गट प्रमुख सुरेश राठोड, केशेगाव जि.प.गट प्रमुख लिंबराज लोखंडे, अमोल भातभागे, शहाजी राऊत, आगतराव वाघ, ज्ञानेश्वर मुळे आदी उपस्थित होते

# महायुतीच्या उमेदवाराला मताधिक्याने आणण्याची शिवसैनिकांची भीष्म प्रतिज्ञा

## भैरवनाथ साखर कारखान्यावर शिवसेनेची बैठक पडली पार



परंडा दि.२१ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभेच्या अनुषंगाने परंडा–भूम–वाशी मतदारसंघातील शिवसेना कार्यकर्ते व पदाधिकारी यांची अत्यंत महत्त्वाची बैठक जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा या लोकसभेसाठी उमेदवारीवर प्रभावीपणे दावा करणारे शिवसेना नेते धनंजय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये पक्षश्रेष्ठीकडून जो कोणी उमेदवार दिला जाईल ? त्याला भरघोस मताधिक्याने आम्ही निवडून आणणारच अशी भीष्म प्रतिज्ञा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दि.२१ मार्च रोजी घेतली केली.

परंडा तालुक्यातील सोनारी येथील भैरवनाथ साखर कारखाना स्थळी लोकसभा निवडणुकी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्यात जागा वाटपावरून मोठ्या घडामोडी घडू लागल्या आहेत. त्याचे तीव्र पडसाद ग्रामीण भागातल्या राजकारणावर उमटू लागले आहेत. परिणामी विविध पक्षांकडून बैठकीचा जोर वाढला आहे. याच अनुषंगाने येथील भैरवनाथ साखर कारखान्यावर लोकसभेच्या निवडणुकीची रणनीती तयार करण्याच्या दृष्टिकोनातून लोकसभेचे संभाव्य उमेदवार धनंजय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब हाडोग्रीकर, माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर, माजी नगराध्यक्ष संजय गाढवे, पाटील, माजी सभापती अण्णासाहेब देशमुख, माजी सभापती दत्ता मोहिते, माजी शिवसेना जिल्हाप्रमुख गौतम लटके, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा आर्चना दराडे, शिवाजीराव भोईटे, युवासेना तालुकाप्रमुख राहुल डोके, मारुती बारसकर महाराज, शिवसेना तालुका संघटक जयदेव गोफणे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी सभापती दत्ता मोहिते, अण्णासाहेब देशमुख, मारुती महाराज बारस्कर, शिवाजीराव भोईटे, शिवसेना महिला आघाडीचे अध्यक्ष अर्चना दराडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. बैठकीमध्ये बुथ कमिटीच्या सदस्यांना महत्त्वाच्या टिप्स देण्यात आल्या. परंडा–भूम–वाशी मतदार संघातील सोशल मीडियावर सक्रियपणे काम करणाऱ्या सदस्यांशी धनंजय सावंत यांनी थेट संवाद साधत निवडणुकीच्या दृष्टिकोनातून सोशल मीडियावर प्रभावितपणे काम करण्याच्या सूचना सावंत यांनी सोशल मीडियाच्या सदस्यांना दिल्या. बैठकीला भूम परंडा तालुक्यातील पदाधिकारी कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## भाजप जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य निवडणुकीच्या मैदानात उतरणार

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली मागणी भाजप धक्का तंत्राचा वापर करणार ?



धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – धाराशिव लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीकडून कोण निवडणूक लढणार हे अद्यापपर्यंत स्पष्ट झालेले नाही. विशेष म्हणजे ही जागा महायुतीमधील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यापैकी कोणत्या घटक पक्षाला देणार याबाबत देखील संभ्रमावस्था कायम आहे. या जागेसाठी अनेकांनी दावेदारी केली असली तरी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांनी थेट मुंबई येथे जाऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची यांच्या निवासस्थान गाठले. तसेच मी पण निवडणूक लढण्यास इच्छूक असल्याची इच्छा चालुक्य यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे ही जागा नेमकी कोणाला सुटणार व कोणता मल्ल रिंगणात उतरणार ? याची उत्सुकता घटक पक्षातील कार्यकर्त्यांना लागू राहिले आहे. दरम्यान, भाजप धक्का तंत्राचा वापर करणार का ? अशी चर्चा सुरु झाली आहे.

धाराशिव लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्यावतीने विद्यमान खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची उमेदवारी खुद्द शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच मतदार संघात ठिकठिकाणी आयोजित केलेल्या जाहीर सभेत जाहीर केली आहे. त्यामुळे खा. राजेनिंबाळकर यांनी आपला प्रचार देखील सुरू केला आहे. मात्र निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर देखील महायुतीच्यावतीने अद्यापपर्यंत देखील उमेदवारी जाहीर केलेली नाही. ही जागा लढविण्यासाठी माहितीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेकडून जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, माजी खासदार प्रा रवींद्र गायकवाड, मंत्री प्रा डॉ सावंत यांचे पुतणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रा. सुरेश बिराजदार यांनी तसेच भारतीय जनता पार्टीकडून आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. अभिमन्यू पवार, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुधीर पाटील, बसवराज मंगरुळे, ॲड व्यंकटराव गुंड, नुकतेच काँग्रेसमधून भाजपमध्ये दाखल झालेले माजी राज्यमंत्री बसवराज पाटील आदींनी उमेदवारीची मागणी केली आहे. त्यामुळे नेमकी उमेदवारी द्यायची कोणाला यावर वरिष्ठ पातळीवर घामासन सुरू आहे. मात्र निर्णय होत नसल्याने कार्यकर्त्यांना उत्सुकता लागलेली असतानाच भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी तालुके यांनी थेट उपमुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन उमेदवारीची मागणी वजा गळ घातली आहे. या उमेदवारीसाठी महायुतीतील घटक पक्षांचे पक्ष प्रमुख कोणत्याही परिस्थितीत आपल्याच उमेदवाराला ही जागा मिळायला पाहिजे यासाठी जोरदार रस्सीखेच सुरु आहे. उमेदवारी देण्यासाठी घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांच्या मॅरेथॉन बैठका सुरू आहेत. मात्र निर्णय लागत नसल्यामुळे ही जागा नक्की कोणत्या पक्षाला मिळणार हे निश्चित होऊ शकले नाही. शिवसेना व भाजप या पक्षांकडून यासाठी जोरदार फील्डिंग लावण्यात येत असून दररोज वेगवेगळे चेहरे समोर येत आहेत. त्यातच भाजपा जिल्हाध्यक्ष चालुक्य यांनी ऐनवेळी एन्ट्री करून उमेदवारीची मागणी केल्यामुळे आजपर्यंत उमेदवारीची मागणी करणाऱ्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. त्यामुळे या मतदारसंघासाठी महायुतीचा उमेदवार कधी व कोणता देणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.


## जिल्हाभरात ५ लाख ३७ हजार रुपयांची अवैध दारु पोलिसांनी पकडली

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात अवैद्य विक्री विशेषतः गावठी दारू तयार करण्याचे अड्डे व ती विक्री करणाऱ्यांचे अक्षरशः गल्लोगल्ली पेव फुटलेले आहेत.

यापैकी १३ ठिकाणांवर छापे टाकून ५ हजार ४०० लिटर दारु निर्मितीचे आंबवलेले रासायनिक द्रव्य नष्ट केले. १ हजार १७४ लिटर गावठी दारु व देशी– विदेशी दारुच्या ७२ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. तो ओतून दिलेला मद्यार्क निर्मितीच्या द्रव पदार्थासह मद्यनिर्मीती साहित्य व जप्त मद्य ५ लाख ३७ हजार ३६० रुपये किंमत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलिसांनी जिल्हाभरात विविध १३ ठिकाणी अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम राबवण्यात येऊन छापे टाकण्यात आले. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेला गावठी दारु निर्मीतीचा सुमारे ५ हजार ४०० लि. आंबवलेले रासयनिकद्रव्य हे नाशवंत असल्याने तो जागीच ओतून नष्ट करण्यात आले. तर सुमारे १ हजार १७४ लि. गावठी दारु व देशी– विदेशी दारुच्या ७२ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. तो ओतून दिलेला मद्यार्क निर्मितीच्या द्रव पदार्थासह मद्य निर्मितीचे साहित्य व जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ५ लाख ३७ हजार ३६० रुपये आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधित पोलीस ठाण्यात १३ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. यामध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ४ ठिकाणी छापे टाकले. या छाप्यात धाराशिव तालुक्यातील जागजी लमाण तांडा येथील केशव शंकर राठोड (वय २९ वर्षे) हे २.३० वा. सु. आपल्या राहात्या घराच्या बाजूस अंदाजे ३२ हजार रुपये किंमतीचे ४०० लि. गावठी दारु निर्मीतीचे गुळ मिश्रीत रासायनिक द्रव व ५० लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तर शाबाई बाबुराव जाधव या १२.४० वा. सु. सुलमान तांडा येथे आपल्या राहात्या घराच्या बाजूस अंदाजे ३२ हजार ८०० रुपये किंमतीची ४०० लि. गावठी दारु निर्मीतीचे गुळ मिश्रीत रासायनिक द्रव व ६० लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तसेच कळंब तालुक्यातील माळकरंजा येथील लैलाबाई उमराव चव्हाण या ४ वा. सु. आपल्या शेतात अंदाजे १ लाख रुपये किंमतीची २२५ लि. गावठी दारु १ हजार लि. गावठी दारु निर्मीतीचे गुळ मिश्रीत रासायनिक द्रव जप्त करण्यात आले. तर बादल उमराव चव्हाण (वय २६ वर्षे) हा ४ वा. सु. आपल्या शेतात अंदाजे १ लाख रुपये किंमतीची २२५ लि. गावठी दारु १ हजार लि. गावठी दारु निर्मीतीचे गुळ मिश्रीत रासायनिक द्रव जप्त करण्यात आले. तसेच उमरगा तालुक्यातील पळसगाव तांडा येथील कुमार रतन चव्हाण व विनोद सोमला पवार यांच्या ताब्यातून साठवण तलावाच्या बाजूस १ लाख ४० हजार रुपये किंमतीची १२०० गावठी दारु निर्मीतीचे गुळ मिश्रीत रासायनिक द्रव व १८० लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तसेच तालुक्यातील पारगाव येथील दिलीप नामदेव घाडगे हे १०.३० वा. सु. २६०० रुपये किंमतीची २० लि. गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या १० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. तसेच तेर येथील सुनिल ज्ञानोबा लोमटे यांने ५.१५ वा.सु. हॉटेल कॉर्नर वाडाच्या पाठीमागे अंदाजे ३१८० रुपये किंमतीची ४० लि. गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. तर तुळजापूर तालुक्यातील देवकुरळी येथील साळुबाई चंद्रकांत तुळसे या ५.३० वा. सु. आपल्या राहात्या घरासमोर अंदाजे १६०० रुपये किंमतीची २० लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तसेच धाराशिव शहरातील साठे नगर येथील शांताबाई प्रल्हाद चव्हाण या १८.४० वा. सु. धाराशिव शहरातील साठे नगर येथे अंदाजे १२५०० रुपये किंमतीची १२५ लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तर वाशी शहरातील सोहेब बशीर पटवेकर हे ७.३० वा. सु. येरमाळा ते कळंब रोडला हॉटेल अनुष्का फॅमिली गार्डनच्या बाजूला अंदाजे ९८० रुपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. तसेच लोहारा तालुक्यातील तावशीगड येथील संतोष राम माने हे ४.४० वा. सु. हे बालाजी मंदिराच्या बाजूस अंदाजे , १०९९ रुपये किंमतीची १९ लि. गावठी दारु जप्त करण्यात आली. तर तुळजापूर येथील वेताळ नगरा समाज मंदिराकडे जाणाऱ्या रोडच्या बाजूस २८०० रुपये किंमतीची देशी विदेशी दारुच्या ३५ सीलबंद बाटल्या जप्त केल्या. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यामध्ये विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत

## जिल्ह्यातील वारसास्थळांचे नवी दिल्ली येथे झाले सादरीकरण




धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – अजय माळी यांच्या वारसास्थळांवरील पुस्तकांचे नवी दिल्ली येथे दि.१६ मार्च रोजी सादरीकरण करण्यात आले. इंडीयन नॅशनल ट्रष्ट फॉर आर्ट ॲण्ड कल्चरल हेरिटेज (इंटॅक) नवी दिल्ली येथे झालेल्या वार्षिक बैठकीत आजीव सदस्य अजय माळी यांनी हे सादरीकरण केले. यासाठी त्यांना विशेष निमंत्रण दिले होते.

अजय माळी यांनी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव वर्षानिमित्त धाराशिव डिस्ट्रीक्ट हेरिटेज प्लेसेस व परंडा किल्ला ही दोन पुस्तके लिहीली. यांचा उद्देश संस्कृतीमधून सन २०३० पर्यंत विकास व युनेस्कोच्या शाश्वत १७ उद्दीष्टांपैकी ११.४ हे उद्दीष्ट म्हणजे वारसास्थळांची जपणूक करून त्यामधून सांस्कृतिक विकास साधणे हा आहे. या पुस्तकात त्यांनी त्यांच्या अप्रतिम फोटोग्राफीचे प्रदर्शन केलेले आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून धाराशिव जिल्हा व परंडा किल्ला या पुस्तकांचे राष्ट्रीय स्तरावरील सादरीकरणाने जिल्हयातील पर्यटनस्थळांची प्रसिध्दी होऊन धाराशिव जिल्ह्याचा संस्कृतीमधून आर्थिक विकास होण्यास नक्कीच मदत होईल. इंटॅकच्या पदसिध्द सदस्यांमध्ये सचिव भारतीय संस्कृती मंत्रालय, सचिव पर्यावरण मंत्रालय, वन मंत्रालय, सचिव नागरी विकास मंत्रालय, डायरेक्टर जनरल नॅशनल म्युजियम, डायरेक्टर जनरल आर्कियॉलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, भारतीय नेवी, भारतीय आर्मीसह वारसाक्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ संशोधकांचा समावेश सदस्यांमध्ये असतो. इंटॅकचा उद्देश वारसास्थळांचे जतन संरक्षण करून त्यास प्रसिध्दी देणे हा आहे. इंटॅक जगातील सर्वात मोठे हेरिटेजची संघटना आहे. जी युनेस्कोला सल्लागार म्हणूनही काम पहाते. ज्याचा उद्देश भारताची सांस्कृतिक, प्राकृतिक वारशाच्या जनतेमध्ये जागरूकता तसेच प्रेरणा निर्माण करणे, प्राकृतिक संसाधने व सांस्कृतिक संपत्तीचे परिरक्षण आणि संरक्षणासाठी उपाय योजना, परंपारिक कला, शिल्प यांचे परिरक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देणे आदी प्रकारची महत्वाची कामे इंटॅक करते.

## जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पासह पायाभूत सुविधांसाठी आणलेला निधी विरोधकांना दिसत नाही

### खा. राजेनिंबाळकर यांचा विरोधकांवर पलटवार



धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी भरीव तरतूद तसेच रेल्वे प्रकल्पासाठीचे भुसंपादन माझ्याच कारकिर्दीत झाले आहे. शिवाय शेतकऱ्यांसाठी विजेची सुविधा मिळावी यासाठी १३०३ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर केला आहे. तर रस्ते विकासासाठी सुध्दा हजार कोटी रुपयांपर्यंत निधी आणलेला विरोधकाना दिसत नाही असा पलटवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विरोधकांवर केला आहे.

जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुख्यमंत्री उध्दव ठाकरे असताना ते मंजुर करुन घेतले आहे. काही महिन्यात तिथ तिसरी बॅच देखील सुरु होईल. कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी उध्दवजी मुख्यमंत्री असताना २२०६ कोटी रुपयाचा भरघोस निधी दिला आहे. १३०३ कोटीपैकी वितरण केले आहे. ६७३ कोटीतून व्यवस्थेच्या आधुनिकीकरण, ३०० कोटी मधून मीटर बसवण्यात येणार आहेत. १२५ कोटीतून फिडर सेपरेशन, २०४ कोटी वीज चोरी रोखण्यासाठी प्रयत्न होणार आहे. वीज वितरणाचे आधुनिकीकरण व संपूर्ण प्रणाली मजबूत करण्यासाठी ६७३ कोटी ८३ लाख रुपयांच नियोजन केल्याचे खासदार ओमराजेनी सांगितले. जिल्ह्यात ४० ठिकाणी ५ एमएस क्षमतेचे उपकेंद्र तसेच ज्या ठिकाणी पूर्वी उपकेंद्र आहेत अशा ३८ उपकेंद्रांमध्ये ५ एमचे ट्रान्सफॉर्मर बसवले जातील. उपकेंद्रात ट्रांसफार्मरची क्षमता पाच एम व्ही ए वरून दहा एम व्ही ए एवढी क्षमता वाढ होणार आहे. १ हजार ९४५ किलो मीटर उच्च दाब वाहिनीचे जाळ असून जिल्ह्यात २ हजार २५० ठिकाणी नवीन रोहित्र तर दिड हजार ५० डीपीची क्षमता ६३ वर करण्यात आली आहे. ७८ ठिकाणी कॅपॅसिटर बँक, ४९ किलो मीटर आवरण असलेली तार बसविण्यात आली. जिल्ह्यात एकशे तेरा ठिकाणी फिडरचे विलगीकरणासाठ १२५ कोटी रुपयाची तरतूद केल्याचे त्यांनी सांगितले. रस्ते विकासाचा विचार केला तर मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत २७ कामासाठी १३४ कोटी निधी आणला तर प्रधानमंत्री सडक योजनेंतर्गत १३३ किलो मीटरचे रस्ते करण्यासाठी ८९ कोटीचा निधी मंजुर केला आहे. तसेच तुळजापुर– नळदुर्ग रस्त्याचे १० मीटर रुंदीकरणासाठी १८३ कोटी निधी मंजुर केला असून त्याची निविदा प्रक्रीया देखील सुरु झाली आहे. तर नळदुर्ग– अक्कलकोट मार्गाचे काम चालू असून त्यावर २७४ कोटी रुपये खर्च होणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. जिल्ह्यात या विकासाच्या कामासाठी विविध योजनेतून ४१३५ कोटी निधी दिसत नाही का ?असा सवाल उमरगा तालुक्यातील दगड धानोरा, मळगेवाडी, गुरुवाडी, पारसखेडा, मळगी व तुळजापूर तालुक्यातील चिवरी, फुलवाडी, धनगर वाडी, केशेगाव येथील आयोजित गाव भेट दौऱ्यात केला. ही सर्व कामे माझ्या प्रयत्नाने झाली असुन जनतेला ते माहित आहे. अडल्यानडल्या जनतेची फोनवरुन होणारी किरकोळात किरकोळ किंवा अगदीच गंभीर काम झाली असतील तर विरोधकांच्या पोटात गोळा येण्याच कारण काय असा सवालही खा राजेनिंबाळकर यांनी केला आहे

## निष्क्रिय खासदाराची उमेदवारी अद्याप जाहीर का नाही ? – चालुक्य

### खा. राजेनिंबाळकर यांच्यावर पलटवार



धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – खासदार किती निष्क्रिय आणि अर्धवटराव आहेत ? हे सगळ्या जनतेला माहीत आहे. महाविकास आघाडी नव्या उमेदवाराच्या शोधत आहे. त्यामुळेच केवळ पोकळ भाषणबाजीत माहीर असलेल्या अर्धवटरावांची उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळेच भांबावून गेलेला खासदार महायुतीकडे उमेदवार नाही अशी लोणकढी थाप मारत सुटला आहे. खासदारांनी महायुतीची काळजी करत बसण्यापेक्षा स्वतः ची उमेदवारी टिकवता येते का ते पहावे ? असा जबरदस्त पलटवार भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांनी खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या त्या वक्तव्यातवर केला आहे.

पुढे चालुक्य यांनी असे नमूद केले आहे की, आपल्या खासदारकीच्या ५ वर्षात मतदारसंघात एकही ठळक काम करता आलेले नाही असा आरोप त्यांनी केला आहे. मतदार आता जाहीरपणे जाब विचारत आहेत. त्यामुळे नैराश्याने ग्रासले गेलेले खा. राजेनिंबाळकर तोंडाला येईल ते बोलत सुटले आहेत. मागील पाच वर्षे मन लावून भरीव विकास कामे केली असती तर निष्क्रियपणाचा ठपका कशाला बसला असता. आता पराभव समोर दिसत असल्यामुळे महाविकास आघाडीवर सक्षम उमेदवार शोधण्याची वेळ आली असल्याचा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे. तसेच स्वतः ला उमेदवारी मिळण्याची खात्री नसल्याने निष्क्रिय खासदार मीच उमेदवार आहे हे भासवण्यासाठी मतदारसंघात दौरे करत सुटले आहेत. अन् महायुतीला उमेदवार नाही अशी लोणकढी थाप मारत असल्याची टीका केली आहे. जनतेला संभ्रमात टाकण्यासाठी महायुतीच्या उमेदवारीबाबत चर्चा न करता स्वतःला उमेदवारी मिळते की नाही ? याची काळजी करावी असा मार्मिक सल्ला चालुक्य यांनी दिला आहे. विशेष म्हणजे मागील पाच वर्षात अधिकारी व कंत्राटदार यांच्याकडून वसुली करण्या पलीकडे खा राजेनिंबाळकर यांचे कर्तृत्व काय ? असा सवाल विचारला आहे. तसेच राज्यात यांची सत्ता होती. तर त्यांचे नेते मुख्यमंत्री होते. त्यावेळी धाराशिव–तुळजापूर–सोलापूर रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा भरावा यासाठी कधी तोंड उघडले का ? परिणामी प्रकल्प रखडला. जर ठाकरे सरकारकडून त्यांनी एवढी बाब करून घेतली असती तर आतापर्यंत तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर दिसले असते. पहिला टप्पा पूर्ण झाला असता. असे असताना ते याचे श्रेय घेण्यासाठी धडपड करत आहेत. हिम्मत असेल तर त्यांनी ठाकरे सरकारने ५० टक्के हिस्सा का दिला नाही ? याचे उत्तर द्यावे असे आव्हान चालुक्य यांनी दिले आहे. तसेच नरेंद्र मोदींजी यांच्या लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार होऊन आपण खासदार झालात हे विसरू नका. आता तुम्हाला पाडण्यासाठी सक्षम उमेदवाराची गरज नाही तर आमचा साधा कार्यकर्ता देखील तुमचा पराभव करण्यासाठी पुरेसा आहे. तुमची अकार्यक्षमता व हफ्तेखोरी आणि टक्केवारीच तुम्हाला गाळात घालणार असल्याचा टोला त्यांनी लगावला आहे. त्याबरोबरच स्वतःची पाठ थोपटून घेण्यासाठी माझ्या विरोधात सक्षम उमेदवार नाही अशी थाप मारण्याऐवजी महाविकास आघाडीची उमेदवारी मिळते का ? याची चिंता करा असा फुकटचा सल्ला दिला आहे. धाराशिव मतदारसंघात महाविकास आघाडीने जे सर्वे केले त्यात खासदारांच्या निष्क्रियतेचा फटका बसणार असल्याचे लक्षात आल्याने महाविकास आघाडी नवा सक्षम उमेदवार शोधत असल्याची बाब सर्वश्रुत असल्याचे चालुक्य यांनी नमूद केले आहे.

# संपादकीय

## दक्षिणेची दहशत

काँग्रेस, द्रमुक हे सनातन धर्माच्या' विरोधी असल्याची टीका करणे, डाव्यांना देशद्रोही लेखणे यांचा उपयोग अजूनतरी झालेला नाही. संघ परिवार भाजपला दक्षिणेत यश मिळवून देईल का? हा प्रश्न आहे.


तामिळनाडूतील सालेम येथील जाहीर सभेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताज्या दक्षिण दौर्याचा समारोप झाला. या वर्षात मोदी यांनी तामिळनाडूला सहा वेळा भेट दिली. गेले पाच दिवस मोदी कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगण, केरळ व तामिळनाडू या दक्षिणेतील राज्यांच्या दौर्यावर होते. भाजपने या सर्व राज्यांत त्यांच्या मिरवणुका व सभांचे आयोजन केले होते. प्रत्येक कार्यक्रमास मोठी गर्दी होईल याची काळजी घेण्यात आली होती. प्रत्येक राज्यात मोदी यांनी काँग्रेस व तेथील विरोधी पक्ष यांच्यावर कडाडून टीका केली. सालेम मधील सभेत त्यांनी काँग्रेस व द्रविड मुन्नेत्र कळघम हे पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे मत व्यक्त केले. त्याचा नेमका अर्थ समजत नाही. मात्र या राज्यात अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम खेरीज आणखी एक पक्ष आपल्या आघाडीत आणण्यात भाजपला यश आले आहे. पट्टली मक्कल कच्छी हा एस. रामदास यांचा पक्ष अखेर आघाडीत आला आहे. उत्तर तामिळनाडूत पीएमकेला लोकसभेच्या दहा जागा व एक कॅबिनेट मंत्रिपद देण्याचे भाजपने कबूल केले आहे. चालू वर्षाच्या प्रारंभापासून मोदी सतत दक्षिणेतील राज्यांना भेट देत आहेत. प्रत्येक राज्यात महत्त्वाच्या मंदिरांना ते आवर्जून भेट देत असतात. त्याचे कारण अर्थातच आगामी लोकसभा निवडणुका हे आहे.

भाजप अस्वस्थ आहे?

या वर्षाच्या सुरुवातीसच मोदी यांनी तामिळनाडू, लक्षद्वीप व केरळचा दौरा केला. अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनापूर्वी त्यांनी रामायणाशी संबंधित अनेक ठिकाणे, मंदिरे यांना भेट दिली. धर्मनिरपेक्ष देशाच्या पंतप्रधानांनी इतका उघड धार्मिक दौरा करणे घटनेत बसते की नाही? हा मुद्दा त्यांनी येऊ दिला नाही. कारण या काळात ते या राज्यांत विकासकामांचे उद्घाटन किंवा लोकार्पण करत होते म्हणजे हा दौरा अधिकृत होता. मात्र त्या नंतरही मोदी दक्षिणेत येतच आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या तेव्हाही मोदी दक्षिणेतच होते. जरी दौरा पंतप्रधानांचा असला तरी प्रत्यक्षात ते भाजपचे कार्य करत होते. प्रत्येक राज्यात कोणी मित्र मिळत आहे का याची चाचपणी या काळात होत होती. कर्नाटकात भाजपने संयुक्त जनता दलास बरोबर घेतले आहे. आंध्र प्रदेशात तेलुगु देशमशी युती केली, केरळमध्ये भारत धर्म जन सेना हा मित्र पक्ष आहे. तेलंगणात मात्र भाजपला मित्र मिळालेला नाही. निवडणुका जिंकण्यात चतुर असलेल्या भाजपला दक्षिणी राज्यांत अजूनही यश आलेले नाही. या पाच राज्यांत मिळून लोकसभेच्या १३२ जागा आहेत. येत्या निवडणुकीत ३७० जागा जिंकण्याचे उद्दिष्ट भाजपने ठेवले आहे. त्यासाठी त्यांना दक्षिणेची मदत आवश्यकच आहे. दक्षिणेत सर्वात जास्त ३९ जागा तामिळनाडूत आहेत. गेल्या वेळी एनडीए'ने त्या सर्व लढवल्या, मिळाली एक जागा. तीही अण्णा द्रमुकला. केरळमध्ये २० पैकी भाजपला एकही जागा मिळाली नव्हती. कर्नाटकात गेल्या वेळी भाजपने २८ पैकी २५ जागा व तेलंगणात १७ पैकी ४ जागा जिंकल्या होत्या. आता दोन्ही राज्यांत काँग्रेस सत्तेत आहे. त्यामुळे भाजपला दोन्ही राज्यांत मिळून दहा जागा तरी मिळतील की नाही हे सांगता येत नाही. आंध्र प्रदेशात लोकसभेच्या २५ जागा आहेत. गेल्या वेळी भाजपला येथेही एकही जागा मिळाली नव्हती. चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देशम पक्षाला तीन जागा मिळाल्या होत्या. आता या दोन्ही पक्षांची युती असली तरी सत्तेतील वायएसआर काँग्रेस भाजपवर नाराज आहे. तो या युतीच्या मार्गात अडचणी उभ्या करेल. काँग्रेसचे आव्हानही वाढत आहे. एकूणच दक्षिणेतील पाचही राज्यांत भाजपची स्थिती बिकट आहे. मोदी यांची हमी, हजारो कोटी रुपयांची कथित विकासकामे यांचा उपयोग येथे झाला नाही. धार्मिक ध्रुवीकरणाचा भाजपचा प्रयोग या पाच राज्यांत फारसा यशस्वी झाला नाही. त्यामुळे आता या भागांत कशाच्या आधारे मते मागायची? हा प्रश्न भाजप समोर उभा आहे. देशाच्या उर्वरित भागांत ३७० जागा कशा मिळणार? हाही प्रश्न आहे. एकूणच दक्षिणेतील राज्यांनी भाजपसमोर दहशत निर्माण केली आहे.

ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया अपेक्षित आहे.

– संपादक **यशवंत** लातूर



## सर चार्लस लिएल ५०

भूगर्भशास्त्राचा पाया घालणारा व उत्क्रांतीवादाला प्रेरणा देणारा महान शास्त्रज्ञ चार्लस लिएलचा जन्म इ.स. १७९५ मध्ये स्कॉटलंडमध्ये झाला. घरच्या श्रीमंतीमुळे उत्तम शिक्षण मिळून तो वडिलांच्या इच्छेखातर नामांकित वकील बनला; पण गिर्यारोहण, पर्यटन आणि डोंगर-दर्यांचे सूक्ष्म अवलोकन हा त्याचा आवडता छंद होता. त्यामुळे डोंगर-दर्यांचे चढ-उतार, प्राण्यांचे सांगाडे, निसर्गातील झंझावाती बदल, पृथ्वीचा उंच सखल पृष्ठभाग, पर्वतांचे तुटलेले कडे, भूकंप, ज्वालामुखी या विषयांवर चार्लस सतत विचारमग्न राहून भ्रमण करीत हिंडे.इ.स. १८३० मध्ये ऐन उमेदीत चार्लसने 'भूगर्भशास्त्राची तत्त्वे' हा ग्रंथ लिहिला. त्यामुळे 'भूगर्भशास्त्र' हा सुद्धा एक शास्त्रीय विषय असून इतर शास्त्रांप्रमाणे महत्त्वाचा आहे, ही गोष्ट चार्लसच्या ग्रंथामुळे सर्वांना पटली. याच सुमारास जेम्स हटन याने लिहिलेले एक पुस्तक चार्लस्च्या वाचनात आले. जेम्स हटनने आपल्या पुस्तकात असे मांडले होते की, रूढ कल्पनेपेक्षा फार पुरातन काळात पृथ्वी निर्माण झाली असली पाहिजे. पृथ्वीचा सध्याचा पृष्ठभाग हा लक्षावधी वर्षांच्या पाऊस, ऊन, वारे, समुद्रलाटा या नैसर्गिक घटनांच्या सततच्या आघातांमुळे तयार झाला आहे. परंतु हे हटनचे मत तत्कालीन लोकांना मान्य नव्हते. पण चार्लसला मात्र त्याची विचारांची दिशा योग्य
आहे असे वाटले.

युरोपमधील सुप्त ज्वालामुखी, गुहा, कपारी, जंगले, आटलेली सरोवरे, दर्या, खोरी यामध्ये अनेक वर्षे हिंडून त्याने दगडावरील ठसे व असंख्य नमुने गोळा केले. त्यांच्या परीक्षणानंतर हटनच्या विधानामधील सत्य चार्लसला पटले. त्याला आता निश्चितपणे वाटले, की पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सध्याचे स्वरूप हे हजारो, लक्षावधी वर्षांच्या सावकाश व सतत होणार्या नैसर्गिक झिजेमुळे झाले आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागात बदल करणारे नैसर्गिक घटक त्याने प्रतिपादन केले. पाऊस, सूर्यप्रकाश, वादळे, भरती-ओहोटी, नद्यांचे प्रवाह, भूकंप, ज्वालामुखी, नद्यांमधील वाळू व अन्य पदार्थ, उष्ण झरे फवारे अशा नैसर्गिक घटनांचा त्याने ठामपणे उल्लेख केला.सन १८३० मध्ये लिएलने प्रसिद्ध केलेल्या भूगर्भशास्त्र या विषयावरील ग्रंथाच्या पाठोपाठ १८३२ व १८३३ या दोन वर्षी या विषयावर आणखी दोन खंड त्याने लिहिले. या पुस्तकांमुळे चार्लसला चांगली प्रसिद्धी मिळून भूगर्भशास्त्रावरील मूलभूत ग्रंथाचा निर्माता म्हणून त्याला मानमान्यताही मिळाली. १८४१ मध्ये अमेरिकेतील बोस्टन विद्यापीठात १२ व्याख्यानांचे एक सत्र खास निमंत्रणावरून त्याने पूर्ण केले. अमेरिकेच्या पर्यटनामध्ये त्याच्या लक्षात काही बाबी आल्या, की नायगरा धबधब्यामुळे आसमंतातल्या खडकाळ पृष्ठभागाची किती झीज होत असावी व दुसरं म्हणजे मिसिसिपी नदीच्या पात्रातून मेक्सिकोच्या आखातात नदीच्या पात्रापाशी किती गाळ साठत असावा ! चार्लसच्या ग्रंथावरून सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मडार्विनफ्ला प्रेरणा मिळाली. अशा या आधुनिक भूगर्भशास्त्राचा जनक म्हणून चार्लस लिएलचे नाव अजरामर झाले आहे.

## ओठ कोरडे पडण्याची आणि फाटण्याची कारणे घ्या जाणून; करा घरगुती उपाय



खूप लोक ओठ फाटण्याच्या समस्येने त्रस्त असतात. लहानांनपासून वृध्दांपर्यंत सर्वजण या समस्येचे बळी पडतात. कोणत्याही प्रकारची क्रिम लावली किंवा लीप बाम लावले तरी ही समस्या कमी होत नाही. काहीवेळा ओठ इतके फाटतात की त्यातून रक्त येवू लागते. त्यामुळे तुम्ही तुमचे ओठ माऊ ठेवण्यासाठी हे घरगुती उपाय करू शकता.

ओठ फाठण्याच्या समस्येची कारणे : डिहायड्रेशन : फाटलेल्या ओठांची अनेक कारणे असू शकतात. पण यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे शरीरात पाण्याची कमतरता. आजकाल लोक जास्त पाणी पीत नाहीत. अशा वेळी शरीरातील आर्द्रता कमी होऊन त्याचा परिणाम चेहरा आणि ओठांवर दिसून येतो.

कोरडी हवा : ओठ फाटण्यामागे कोरडी हवा हे देखील एक कारण असू शकते. त्यामुळे असा वारा टाळावा.

जास्त सूर्यप्रकाश : सूर्यप्रकाशात जाणे हे देखील कोरडे ओठांचे एक कारण असू शकते. त्यामुळे जास्त सूर्यप्रकाशात जाणे टाळावे.

एक्सफोलिएशन : तुमचे ओठ कोरडे असल्यास, एक्सफोलिएशन टाळा. कारण ओठांना वारंवार स्पर्श केल्याने देखील ओठ फाटू शकतात.

फाटलेल्या ओठांच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी टिप्स :

बदामाचे तेल : रोज रात्री झोपण्यापूर्वी ओठांना बदामाचे तेल लावा. हे तुमचे ओठ फाटण्यापासून देखील प्रतिबंधित करेल आणि तुमचे ओठ गुलाबी आणि मऊ ठेवतील.

देसी तूप लावा : देसी तुपाची पेस्ट ओठांवर लावल्याने फाटलेले ओठ दूर होऊ शकतात.

खोबरेल तेल : नारळाच्या तेलाचा वापर केल्याने कोरड्या ओठांची समस्या दूर होईल. नारळ तेल त्वचेला हायड्रेट ठेवते आणि फाटलेल्या ओठांच्या सम स्येपासून देखील आराम देते कारण नारळाच्या तेलामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-फंगल गुणधर्म त्वचेचा कोरडेपणा दूर करतात. मॉइश्चरायझिंग गुणधर्मांनी समृद्ध, खोबरेल तेल ओठांची आर्द्रता टिकवून ठेवते.

लिप बाम लावा : जर तुम्हाला फाटलेल्या ओठांचा त्रास होत असेल तर दिवसातून दोन ते तीनदा लिप बाम लावा. क्रीम मसाज केल्याने ओठांचा कोरडेपणा दूर होतो. यामध्ये व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन बी१२, कॅल्शियम सारखे घटक असतात, जे त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यास मदत करतात आणि त्वचा निरोगी बनवतात.

## प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

**गुरु वचन**

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

## आश्रय

एका माणसाला एकदा सापाचं पिल्लू मिळालं. त्यानं ते घरी आणलं व तो त्याची देखभाल करू लागला. त्याला बांबूचं नळकांडं करून दिलं. त्यात गवत वगैरे घालून त्याच्या राहण्याची सोय करून दिली. त्याला खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली. एकदा एक साधू तिथं आला. त्यानं हे पहिलं व तो त्या माणसाला म्हणाला, ''हे काय करतोस भलतंच तू ! भलत्यावर प्रेम करून त्याला आश्रय देणं धोक्याचं आहे. उद्या तुझ्यावर जीवित गमावण्याची वेळ येईल. तेव्हा वेळीच सावध हो आणि हा नाद सोडून दे.'' त्या माणसावर या उपदेशाचा काही परिणाम झाला नाही. एकदा काही कारणानं तो माणूस दोन दिवस बाहेरगावी गेला होता. तेथील सारी कामे आटोपून तो घरी परतला. आल्यावर त्यानं आपल्या लाडक्या सापाला हाक मारली. तो बाहेर येईना म्हणून त्याच्या घरात हात घातला. त्याबरोबर त्या सापानं दंश केला वत्या माणसाला प्राण गमवावे लागले.

कथा उपदेश : दुष्टाला आश्रय देऊ नये.



## नोकरीचा इंटरव्ह्यू देण्यापूर्वी लक्षात ठेवा या १० गोष्टी, तरच मिळेल नोकरी


नोकरी मिळवण्याच्या मार्गात मुलाखत हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. मुलाखतीच्या तयारीसाठी, बहुतेक उमेदवार नोकरीशी संबंधित कौशल्यांवर लक्ष केंद्रित करतात, परंतु मुलाखतीत विचारलेल्या आणि विचारात घेतलेल्या अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. मुलाखतीतील या छोट्या-छोट्या गोष्टींमुळे मुलाखतकारावर चुकीची छाप पडू शकते.

मुलाखतीदरम्यान मुलभूत प्रश्नांपासून ते ड्रेस अप आणि कंपनीबद्दल संशोधन करण्यापर्यंत अनेक गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. मुलाखत देण्यापूर्वी, त्या १० टिप्स जाणून घ्या ज्यामुळे नोकरीची मुलाखत यशस्वी होईल.

१० टिप्स ज्यामुळे मुलाखत होईल यशस्वी

कंपनीबद्दल संशोधन: तुम्ही ज्या कंपनीसाठी मुलाखत देणार आहात ती कंपनी कोणत्या प्रकारची उत्पादने देते. कंपनीने कोणते रेकॉर्ड केले आहे आणि कंपनीचा इतिहास कसा आहे. ही माहिती गोळा करा. मुलाखती दरम्यान, तुम्ही ज्या कंपनीत काम करणार आहात त्याबद्दल तुम्हाला किती माहिती आहे, हे विचारले जाऊ शकते.

मूलभूत प्रश्नांची उत्तरे ठरवा : मुलाखतीत काही मूलभूत प्रश्न नक्कीच विचारले जातात. जसे-स्वत:बद्दल सांगा, मागील कंपनीतील तुमच्या जबाबदार्या आणि नवीन कंपनीकडून तुमच्या अपेक्षा काय होत्या हे सांगा. अशा प्रश्नांची उत्तरे काय द्यायची याची आधीच तयारी करा.



व्यवस्थित कपडे घालून जा: जर तुम्ही मुलाखतीला जात असाल तर व्यवस्थित कपडे घालून जा. औपचारिक कपड्यांमध्ये जा. कपड्यांच्या रंगांची निवड अशी असावी की ते डंकणार नाहीत. जर तुम्ही स्त्री असाल तर किमान दागिने बाळगा. तुम्ही पुरुष असाल तर ग्रूमिंग टिप्स फॉलो करा.

थोडे लवकर पोहोचा: मुलाखतीसाठी नेहमी थोडे आधी पोहोचा. ही सवय तुम्हाला घाबरण्यापासून वाचवेल आणि मुलाखतीसाठी तुम्ही मानसिक दृष्ट्या तयार होऊ शकाल. याशिवाय या सवयीचा मुलाखत घेणार्यांवरही सकारात्मक परिणाम होतो.

चांगली छाप पाडा: मुलाखतीच्या सुरुवातीपासूनच विनम्र व्हा. त्यांना भेटताच हस्तांदोलन करा आणि डोळ्यांचा संपर्क कायम ठेवा. संपूर्ण मुलाखतीदरम्यान तुमचा दृष्टीकोन सकारात्मक ठेवा, तुमचा आवाज मोठा होत आहे किंवा तुम्ही नकारात्मक वृत्ती अंगीकारत आहात असे त्यांना कधीही वाटू नये.

आत्मविश्वास बाळगा: मुलाखतीदरम्यान तुम्ही ज्या काही प्रश्नांची उत्तरे द्याल, त्यांची उत्तरे पूर्ण आत्मविश्वासाने द्या. उत्तरांमध्ये सकारात्मक विचार दिसून आला पाहिजे. तुमचे लक्ष मुलाखतीवरच आहे असे मुलाखतकाराला वाटले पाहिजे.

घाबरू नका: प्रश्नांची उत्तरे देताना घाबरू नका. जे काही प्रश्न विचारले जात आहेत, ते काळजीपूर्वक ऐका. काही सेकंदांचा विराम घेऊन त्यांना उत्तर द्या. उत्तर देताना स्वत:ला रिलॅक्स ठेवा, तरच तुम्ही चांगली मुलाखत देऊ शकाल.

तुम्ही प्रश्न देखील विचारा: मुलाखत म्हणजे फक्त उत्तरे देणे नव्हे. उमेदवार मुलाखतकर्त्यांना देखील प्रश्न विचारू शकतात. म्हणूनच संपूर्ण मुलाखतीदरम्यान किमान एक प्रश्न विचारा. हे सांगते की तुम्ही किती सतर्क आहात आणि तुम्हाला मुद्दा कसा स्पष्ट करायचा हे माहित आहे.

तुमची भूमिका स्पष्ट करा: मुलाखत कक्षातून बाहेर पडताना, मुलाखत घेणार्याला धन्यवाद देऊन बाहेर पडा. पूर्ण उर्जेने आणि सकारात्मक वृत्तीने त्यांचे आभार माना. फॉलोअप: तुमची इच्छा असल्यास, तुम्ही मुलाखत आयोजित करण्यासाठी एचआर मॅनेजरला धन्यवाद ईमेल पाठवू शकता. मुलाखतीनंतर २४ तासांच्या आत हा ईमेल पाठवून तुम्ही त्यांचे आभार मानू शकता.

## राशी भविष्य



राशी भविष्य

२१ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व
मुलांचे नेत्रदीपक यश व आर्थिक आघाडीच्या आश्वासक हालचाली या आपल्या जमेच्या बाजू राहतील.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व
नाराज झालेली मित्रमंडळी, सगेसोयरे, सहकारी हे संक्रातीच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येतील.

मिथुन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
काहीजणांना परगावी जाण्याचे, सहलीचे तर काहीजणांना परदेश दौऱ्याचे वेध लागतील.

कर्क : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
जुने मित्र परिवार यांच्याबरोबर मजेत वेळ जाईल, जुन्या आठवणींना उजाळा मिळेल.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
महिलांचा वेळ देवधर्म, पूजाअर्चा यात चांगला जाईल. त्यातून समाधान मिळेल.

कन्या : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
महिलांचा बिघडलेला खाद्यपदार्थ थट्टेचा विषय होईल. युवकांनी व्यसनापासून दूर रहा.

तुळ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण
गोड-धोड खाण्याचे प्रसंग येतील. आपल्या जुन्या रुढी-परंपरा जपण्यासाठी काही कार्यक्रमांचे आयोजन कराल.

वृश्चिक : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. नातेसंबंध दृढ होतील, वैवाहिक जोडीदाराची साथ चांगली मिळेल.

धनु : शुभ रंग :लाल, शुभ दिशा :पश्चिम
पथ्यपाणी असलेल्यांनी जास्तीचे गोड खाणे टाळा. महिलांनी स्वयंपाक घरातील वावर काळजीपूर्वक करावा.

मकर : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम
गोड बोलण्यांने होणारे फायदे लक्षात येतील. वृद्धांनी आपले पथ्यपाणी सांभाळणे हितकारक ठरेल.

कुंभ : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
गोड-धोड जेवणावर योग्य नियंत्रण आणा. संततीकडे आपले दुर्लक्ष होत नाही ना याकडे लक्ष द्या.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

२१ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, सुर्य, गुरू व मंगळाचा प्रभाव आहे. तुमच्याकडे ऊर्जेचा प्रचंड साठा आहे. न थकता तुम्ही बराच काळ काम करू शकता. तुमच्या उत्साही स्वभावामुळे इतरांनाही स्फूर्ती मिळते. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. लोकांची दु:खे, समस्या दूर करण्यासाठी तुम्ही तत्पर असता. वेळप्रसंगी त्यासाठी सामाजिक आंदोलनही उभारता. ऐहिक गोष्टींबरोबर आध्यात्मिक प्रगती करून घेण्यातही तुम्हाला रस असतो. नीतीमुल्यांना, कायद्याला सोडून तुम्ही सहसा वागत नाही. इतरांनीही आपल्यासारखी ही मुल्ये पाळावीत अशी तुमची अपेक्षा असते.

आपल्या आस्मितेचे रूपांतर गर्विष्ठपणात होऊ देऊ नका. इतरांच्या सल्ल्यामधले तथ्य ओळखायला शिका. इतरांच्या कामात स्वत:ला गुंतवून घेतांना आपले नुकसान होणार नाही ते पहा. आपल्या वजनावर नियंत्रण ठेवा. नाहीतर मधुमेह, उच्च रक्तदाबासारखी दुखणी उद्भवतील. संतापामुळे डोकेदुखीचाही त्रास होईल.

कार्यक्षेत्र : समाजाचे कल्याण व्हावे या हेतूने कार्य करणार्या खाजगी व शासकीय संस्था तुमच्या मानसिक जडणघडणीस अनुकूल ठरतील. शासकीय समाजकल्याण केंद्रे, इस्पितळे, महानगरपालिका अशा ठिकाणी महत्वाचे पद तुम्हाला लवकर मिळू शकेल. इतरांशी संवाद साधणे शक्य असल्याने सहकारी गृहनिर्माण संस्था, साखरकारखाने, पतपेढ्या या प्रांतात प्रगती होऊ शकते. शिक्षण, अध्यापन, न्यायदान, बँकिंग, पत्रकारिता हे व्यवसायही उत्कर्षास पूरक ठरतील.

प्रणयी जीवन : जोडीदारानेही आपल्यासारखाच समाजकार्यात रस घ्यावा अशी तुमची अपेक्षा असते. निदान आपल्या कार्याला त्याने मनापासून उत्तेजन पाठिंबा द्यावा असेही तुम्हास वाटते. वैवाहिक जीवनात तुम्ही सुसंवाद, समाधान, संतोष यांना महत्व देता. स्वार्थी लंपट माणसे तुम्हाला आवडत नाहीत. ऑक्टोबर २३ ते नोव्हेंबर २२ मधील व्यक्ती टाळा. मे २१ ते जून २० दरम्यानच्या व्यक्तीतून निवड करा.

वर्षफळ : शिक्षण, वकिली, कारखानदारी या क्षेत्रात उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करू शकाल. व्यवसायात गुंतवणूक करण्यास हरकत नाही. जानेवारी फेब्रुवारी मध्ये प्रभावी वकृत्वाने राजकारण गाजवाल. मार्च एप्रिल मध्ये उच्च शिक्षण, प्रशिक्षणाची संधी सोडू नका. जून जुलै मध्ये नवे प्रतिबंध निर्माण होण्याची शक्यता आहे. मंगलकार्ये ठरतील. सप्टेंबर मध्ये दूरचे प्रवास, उच्च पदस्थांच्या भेटीतून कामे होतील. नोव्हेंबर मध्ये सत्तेपासून काही काळ दूर राहिल्याने अस्वस्थता जाणेवल.

महत्वाचे वर्ष : ३, १२, २१, ३०, ३९, ४८, ५७, ६६, ७५.

भाग्यरत्न : पुष्कराज

याच तारेखेची व्यक्ती : बिस्मिल्ला खान, काननकौशल

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com






# अनन्या पांडेचा पाहायला मिळणार एक अनोखा संघर्षमय प्रवास, कॉल मी बेचा फर्स्ट लूक रिलीज

मुंबई,-'कॉल मी बे' या बहुप्रतिक्षित वेब सीरिजम धील बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडेचा फर्स्ट लूक मंगळवारी दुपारी प्रदर्शित झाला. या मालिकेत ती अब्जाधीश फॅशनिस्टाच्या भूमिकेत दिसणार आहे. मालिकेबद्दलची घोषणा गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये आली होती आणि त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये शोच्या पहिल्या सीझनचे शुटिंग पूर्ण करण्यात आले होते.

मंगळवारी इन्स्टाग्रामवर निर्मात्यांनी अनन्याचा फर्स्ट लुक टाकला आणि कॅप्शनम ध्ये लिहिले, ''मालमत्तेची वारसदार ते उद्योजिका असलेल्या बे हिने शोधून काढली की, तिचे किंमती मालमत्ता हिरे नाहीत तर तिचे तिची स्ट्रीट स्मार्ट आणि स्टाईल आहे. तिनं बंधने तोडली परंतु तोडल्याचं नाकारलं आणि ती मुंबईच्या न्यूजरुममधून तिच्या प्राणप्रिय जीवलग, बहिणी आणि तिच्या भल्यासाठी ती सही सलामत निघाली.''

पोस्ट पाहिल्यानंतर सोशल मीडियावर तिच्या,साठी कौतुकाचा वर्षाव सुरू झाला. एकाने लिहिले की, ''अनन्या पांडे खूप सुंदर दिसत आहे'' अशी टिप्पणी केली, तर दुसऱ्याने उत्सुकता व्यक्त करताना लिहिले, ''तिची कामगिरी पाहण्यासाठी जास्त प्रतीक्षा करू शकत नाही.''

आगामी 'कॉल मी बे' या प्राइम व्हिडीओ मालिकेत अनन्या पांडे ही बेईच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहे. यामध्ये ती एका फॅशन टायकूनची भूमिका साकारत आहे. यामध्ये ती कठीण परीक्षेला सामोरे जाताना तिच्या श्रीमंत कुटुंबापासून विभक्त होण्याचा सामना करते. कथा जसजशी उलगडत जाईल, तसतसे प्रेक्षक बे च्या बदलत गेलेल्या प्रवासाचे साक्षीदार होतील. या प्रवासामध्ये सामाजिक पूर्वाग्रह आणि पूर्वकल्पनांविरुद्ध लवचिकता पाहायला मिळेल.

कॉलिन डी'कुन्हा दिग्दर्शित आणि करण जोहरच्या धर्मिक एंटरटेनमेंटच्या वतीने निर्मित केलेल्या, या मालिकेत वीर दास, गुरफतेह पिरजादा, वरुण सूद, विहान सामत, मुस्कक्कन जाफेरी, निहारिका लिरा दत्त, लिसा मिश्रा आणि मिनरिंग यांसारख्या प्रतिभावान कलाकारांचा समावेश आहे.

# श्रद्धा कपूरला लागली भूक, मागितला फ्री पिझ्झा

मुंबई -हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री श्रद्धा कपूर ही सोशल मीडिया खूप सक्रिय असते. ती नेहमीच सोशल मीडियावर आपले सुंदर फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांबरोबर शेअर करत असते. श्रद्धा कपूर नुकतीच १८ मार्च रोजी संध्याकाळी मुंबईमधील एका कार्यक्रमात पोहोचली होती, तेव्हा तिला खूप भूक लागली होती. यावेळी पापाराझीचं स्टॉल बाहेर पिझ्झा वाटत होते. तिला प्रचंड भूक लागली असल्यानं तिनं पटकन जाऊन विचारले की 'काही अतिरिक्त आहे का, जर असेल तर मला एक नक्की द्या.'' यानंतर तिला एक व्यक्ती पिझ्झा देतो. यावर ती, धन्यवाद म्हणते आणि तिथून निघून जाते.श्रद्धा कपूर मागितला फ्री पिझ्झा : यानंतर तिचा आणखी एक व्हिडिओ समोर आला ज्यात ती म्हणते ,''मला खूप भूक लागली होती. तुम्ही माझ्याबरोबर पिझ्झा शेअर केला त्याबद्दल धन्यवाद. माझ्याकडून देखील एक ट्रीट बाकी आहे.'' हा पिझ्झा स्टॉल पापाराझीनं लावला होता. आता तिचे दोन्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अनेकजण श्रद्धा कपूरला क्यूट असल्याचं म्हणत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओच्या कमेंट सेक्शनमध्ये अनेकजण तिच्यावर खूप प्रेमाचा वर्षाव करत आहेत.

# कंजंक्टिव्हायटिस - डोळे येणे

वातावरणात अनेक रोगांच्या साथी पसरतात आणि त्यापैकीच एक म्हणजे डोळ्यांचा संसर्ग. सामान्यपणे आपल्या डोळ्यातील पांढऱ्या भागावर आणि पापण्यांच्या आतील भागावर पारदर्शक असा थर असतो, ज्याला कंजंक्टिव्हा' असे म्हणतात. कंजंक्टिव्हायटिस अथवा डोळे येणे म्हणजे याच कंजंक्टिव्हाला सूज येणे. पिंक आय किंवा आय फ्ल्यू म्हणून देखील ओळखल्या जाणाऱ्या या आजारामध्ये कंजंक्टिवा (नेत्रश्लेष्मला) म्हणजेच डोळ्याच्या पांढऱ्या भागावरती असलेल्या पातळ ऊतींवर आणि पापणीच्या आतल्या बाजूस दाह होतो. बहुतांश केसेसमध्ये कंजंक्टिवायटिस हा आजार विषाणूंमुळे होणाऱ्या संसर्गामुळे होतो.

लक्षणे

डोळ्याचा पांढरा भाग लालसर होणे
कंजंक्टिवाला (डोळ्याचा पांढरा भाग) सूज येणे
डोळ्यात सतत काहीतरी गेल्यासारखे वाटून डोळ्यांचे खुपणे आणि डोळे चोळावेसे वाटणे
डोळ्यातून नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात पाणी येणे
डोळ्यातून पिवळा स्राव येणे, हा पिवळा स्राव पापण्यांवर जमा होतो, खासकरून झोपून उठल्यावर हा स्राव जास्त प्रमाणात दिसतो. यामुळे जेव्हा तुम्ही झोपून उठता तेव्हा पापण्या जड आणि चिकटलेल्या असतात
डोळ्यांना खाज येणे
डोळ्यांमध्ये जळजळ होणे
तीव्र प्रकाश सहन न होणे (संवेदनशीलता)
डोके दुखणे
काही प्रसंगी दृष्टी काही अंशी अस्पष्ट होणे
लर्जीमुळे डोळे आले असल्यास पापण्यांना सूज येणे आणि खाज येणे

डोळे येण्यामागची कारणे-

१) जिवाणू अथवा विषाणूंच्या संसर्गामुळे होणारा कंजंक्टिव्हायटिस : याचे संक्रमण एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीस होते. डोळे आलेल्या व्यक्तीचा रुमाल, चष्मा, आयड्रॉप्स किंवा सौंदर्यप्रसाधने यांच्या वापरामुळे इतरांकडे त्याचा प्रसार होतो. स्टॅफिलोकॉकस, स्ट्रेप्टोकॉकस, हिमोफिलस असे जिवाणू आणि डेनोव्हायरस, टेरोवायरस, हरपीस असे विषाणू कारणीभूत असू शकतात.

विषाणूंच्या संसर्गामुळे होणाऱ्या कंजंक्टिव्हायटिसची लक्षणे
डोळ्याचा पांढरा भाग लालसर होणे
डोळ्यात सतत काहीतरी गेल्यासारखे वाटून डोळ्यांचे खुपणे आणि डोळे चोळावेसे वाटणे
तीव्र प्रकाश सहन न होणे (संवेदनशीलता)

जिवाणूच्या संसर्गामुळे होणाऱ्या कंजंक्टिव्हायटिसची लक्षणे
डोळ्याचा पांढरा भाग लालसर होणे
डोळ्यातून पिवळा स्राव येणे, हा पिवळा स्राव पापण्यांवर जमा होतो, खासकरून झोपून उठल्यावर हा स्राव जास्त प्रमाणात दिसतो. यामुळे जेव्हा तुम्ही झोपून उठता तेव्हा पापण्या जड आणि चिकटलेल्या असतात
कंजंक्टिवाला (डोळ्याचा पांढरा भाग) सूज येणे
तीव्र प्रकाश सहन न होणे (संवेदनशीलता)



२) लर्जीमुळे होणारा कंजंक्टिव्हायटिसः वातावरणातील बदल, हवेतील परागकण, धूळ, धूर, प्रदूषण, प्राण्यांचे केस आणि दीर्घकाळासाठी कॉन्टॅक्ट लेन्सेसचा वापर यामुळे लर्जी होऊन डोळे येतात.

लर्जीमुळे होणाऱ्या कंजंक्टिव्हायटिसची लक्षणे
डोळ्याचा पांढरा भाग हल्का लालसर होणे
डोळ्यातून नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात पाणी येणे
डोळ्यांना खाज येणे
डोळ्यांमध्ये जळजळ होणे

३) दूषित पाणी अथवा रासायनिक द्रव्ये यांचा डोळ्यांशी संपर्क
४) हानिकारक प्रकाश किंवा किरणे
५) डोळ्यांना सतत आणि दीर्घकाळासाठी कोरडेपणा असणे
६) काही ऑटोइम्म्युन आजारामध्येही कंजंक्टिव्हायटिस होतो
७) प्रसूतीच्या वेळेस निष्काळजीपणा व अस्वच्छ पद्धती यामुळे नवजात अर्भकांमध्ये कंजंक्टिव्हायटिस आढळून येतो.
८) शरीराची अस्वच्छता व एकंदर अस्वच्छ जीवनमान यामुळे देखील डोळे येतात आणि त्याची साथ पसरण्यास वाव मिळतो.

**निदान आणि उपचार**

वरीलप्रमाणे लक्षणे आढळून आल्यास वेळीच नेत्रचिकित्सकांकडून डोळ्याची तपासणी करून घ्यावी. लक्षणे पाहून आणि क्लिनिकल मूल्यांकन करून डॉक्टर उपचार सांगतात.

जिवाणूंच्या संसर्गासाठी अँटिबायोटिक आयड्रॉप्स तर विषाणूंच्या संसर्गासाठी लुब्रिकेटिंग आयड्रॉप्स आणि सूज कमी करणारे आयड्रॉप्स डॉक्टर देतात. लर्जीमुळे डोळे आले असल्यास अँटिहिस्टॅमिनीक आणि गरजेनुसार स्टिरॉइड आयड्रॉप्स दिले जातात. सूचना दिल्याप्रमाणे उपचार आणि काळजी घेतल्यास सामान्यपणे ७-१० दिवसात सुधारणा दिसून येते. परंतु, दीर्घकाळ लक्षणे राहिल्यास डॉक्टर डोळ्यातील डिस्चार्ज स्वॉब घेऊन त्याची तपासणी करतात आणि त्यानुसार विशिष्ट अँटिबायोटिक व अँटीइंफ्लमेटरी गोळ्या घेण्याचा सल्ला देतात.डोळ्यांची काळजी घेण्याच्या टिप्स-

हात वारंवार साबण आणि कोमट पाण्याने कमीत कमी २० सेकंद धुवावेत. साबण आणि पाणी उपलब्ध नसेल तर अल्कोहोल-बेस्ड हॅन्ड सॅनिटायझर वापरा

डोळ्यांना हात लावणे किंवा चोळणे टाळावे

डोळ्यांमधून येणारा स्राव तसेच डोळ्यांच्या आजूबाजूचा भाग स्वच्छ हातांनी धुवावा. ही क्रिया दिवसातून अनेक वेळा करावी

संसर्ग झालेल्या आणि संसर्ग न झालेल्या डोळ्यांसाठी एकच आय ड्रॉप वापरू नये.

कॉन्टॅक्ट लेन्सेस पुन्हा वापरू शकता असे डोळ्यांचे डॉक्टर जोपर्यंत सांगत नाहीत तोपर्यंत कॉन्टॅक्ट लेन्सेस वापरू नयेत

चष्मा स्वच्छ ठेवा, तुमच्या हॅन्ड टॉवेलसारख्या वस्तू फक्त तुम्हीच वापरा, इतरांसोबत शेयर करू नका, तसे केल्यास संसर्ग वाढण्याचा, पसरण्याचा धोका असतो

उशा, हात व चेहरा पुसण्याचे कापड, टॉवेल, आय ड्रॉप्स, डोळे किंवा चेहऱ्यांचा मेकअप, मेकअपचे ब्रशेस, कॉन्टॅक्ट लेन्सेस, कॉन्टॅक्ट लेन्स ठेवण्याच्या केसेस आणि चष्मा यासारख्या व्यक्तिगत वस्तू इतरांच्या वापरू नका, तुमच्या वस्तू इतरांना देऊ नका

स्विमिंग पुलमध्ये जाऊ नका

काय करावे:

१. आरोग्याला पोषक आहार आणि पुरेशी झोप घ्या. यामुळे तुमची रोगप्रतिकार शक्ती वाढेल.
२. हात वारंवार सॅनिटाईज करा.
३. जर दृष्टी अस्पष्ट झाली असेल किंवा असह्य वेदना होत असतील तर पूर्णकालीन नेत्ररोगतंज्ञ सेवा जिथे उपलब्ध आहेत अशा डोळ्यांच्या डॉक्टरशी तातडीने संपर्क साधा

काय करू नये :

१. कंजंक्टिवायटिसचा संसर्ग खूप लोकांना होत असल्यास गर्दीच्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळा.
२. तुम्हाला जर कंजंक्टिवायटिसचा संसर्ग झालेला असेल तर सार्वजनिक ठिकाणी जाऊ नका कारण अशा ठिकाणी संसर्ग खूप जास्त पसरतो.
३. डोळ्यांना वारंवार हात लावणे टाळा.

स्वत: औषधोपचार करू नका :

जर तुम्हाला डोळ्याच्या फ्लूची लक्षणे दिसत असतील तर त्याबद्दल तज्ञांशी संपर्क साधा आणि उपचार करा. कोणतीही ओव्हर द काउंटर औषधे किंवा आयड्रॉप स्वतः वापरू नका कारण ते तुमचा धोका वाढवू शकतात. डोळ्यांच्या इतर अनेक समस्यांमध्ये आय फ्लू सारखीच लक्षणे असू शकतात, त्यामुळे लक्षणांचे नेमके कारण शोधून त्यावर उपचार करणे महत्त्वाचे आहे.

शाळेत जाणाऱ्या मुलांना डोळ्यांचा संसर्ग होऊ नये यासाठी काय करता येईल?

१. मुलांचा गणवेश स्वच्छ असावा.
२. मुलांना वारंवार डोळ्यांचा स्पर्श करण्यास मनाई करा.
३. मुलांना वारंवार हात धुण्यास सांगा.
४. ते शक्य नसेल तर, मुलांच्या बॅगेत सॅनिटायझर ठेवा आणि ते वापरायला सांगा.
५. शाळेतून आल्यावर मुलांचे हात-पाय साबणाने स्वच्छ धुवा.
६. स्वच्छ हाताने डोळे पाण्याने धुवा.
७. संक्रमित व्यक्ती आणि पाळीव प्राण्यांपासून मुलांना दूर ठेवा.
८. मुलांना योग्य प्रमाणात पाणी पिण्यास सांगा.

डोळ्यांचा संसर्ग दूर करण्यासाठी सोपे घरगुती उपाय

१. गुलाबपाणी-डोळ्यांच्या फ्लूपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही गुलाबजल देखील वापरू शकता. गुलाब पाण्यामध्ये अँटीसेप्टिक आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असतात. यामुळे संक्रमण करणाऱ्या जंतूंशी लढण्यास मदत होते, डोळ्यांच्या फ्लूमुळे होणारी समस्या कमी होऊन डोळ्यांना आराम मिळतो. यासाठी फक्त गुलाब पाण्याचे दोन थेंब डोळ्यात टाका.

२. बटाटा-डोळ्यांचा संसर्ग टाळण्यासाठी बटाटा फायदेशीर ठरू शकतो. बटाट्यामध्ये कूलिंग इफेक्ट असल्याने डोळ्यांच्या संसर्गामुळे होणारा त्रास कमी होऊ शकतो. यासाठी बटाट्याचे गोल काप करून ते डोळ्यांवर ठेवा. बटाट्याचे तुकडे १०-१५ मिनिटे डोळ्यांवर राहू द्या.


३. तुळशी-तुळशीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. यामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे पदार्थ आणि अँटीऑक्सिडेंट हे उपयोगी गुणधर्म आहेत. तुळशीची काही पाने पाण्यात रात्रभर भिजत ठेवा. त्यानंतर सकाळी यातील तुळशीची पानं गाळून या पाण्याने डोळे धुवा.

४. काकडी -
काकडीमध्ये कूलिंग इफेक्ट असल्याने डोळ्यांच्या संसर्गामुळे होणारा त्रास कमी होऊ शकतो. यासाठी काकडीचे गोल काप करून ते डोळ्यांवर ठेवा. काकडीचे तुकडे १०-१५ मिनिटे डोळ्यांवर राहू द्या. ५. हळद
हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट असतात. हळदीमध्ये असलेले औषधी गुणधर्म डोळ्यांच्या संसर्गास प्रतिबंध करण्यास मदत करतात. अर्धा चमचा हळद पावडर थोड्या कोमट पाण्यात मिसळा. नंतर हळदीच्या पाण्यात कापूस भिजवून डोळ्यांना लावा. यामुळे डोळ्यांमधील घाण निघून जाईल. तसेच वेदना आणि जळजळीपासून आराम मिळेल.

हा आजार कितपत गंभीर आहे ?

हा आजार बिलकुल गंभीर नाही; परंतु योग्य काळजी न घेतल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास, तसेच औषध उपचार न केल्यास या आजाराचे उपद्रव निर्माण होतात आणि मग हा आजार गंभीर स्वरूपात निर्माण होतो. यथायोग्य उपचार घेतल्यास हा आजार साधारणतः ३ ते ७ दिवसांमध्ये पूर्ण बरा होतो.

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

## वारसाचे प्रमाणपत्राबद्यल जाहीरनामा

अहमदपूर येथील मा. तिसरे सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अहमदपूर यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२२/२०२४

निशाणी क. ०७

ज्यापेक्षा लक्ष्मण पि.गंगाराम सुर्यवंशी हे दिनांक ०७-१२-२०२२ रोजी किंवा त्या सुमारास येलदार येथे मयत झाले आणि

अर्जदार क. १)दिगांबर पि. लक्ष्मण सुर्यवंशी, वय ५८ वर्ष धंदा-शेती रा.येलदरा ता.जळकोट जि.लातूर

२) श्रीमती पंचफुला भ्र.माधव सुर्यवंशी, वय ६० वर्ष धंदा-घरकाम रा. सदर,

३) सौ. सावित्रीबाई भ्र.राम माने, वय ४३ वर्ष धंदा-घरकाम रा.हावरंगा ता. जळकोट जि. लातूर.

४) गणपत पि. माधवराव सुर्यवंशी, वय ३५ वर्ष धंदा-शेती रा. येलदरा ता.जळकोट जि.लातूर

५) बालाजी पि.माधव सुर्यवंशी, वय ३५ वर्ष धंदा-शेती रा.सदर.

६) सौ.आदिमाया भ्र. साहेबराव भोसले, वय ३६ वर्ष धंदा-घरकाम रा.स.नं. १७/१/४० बुके टॉवर जवळ, फॉरेस्ट कंम्पाउंड, आंबेगांव पठार, धनकवडी, पुणे शहर पुणे-४११०४३.

७) श्रीमती जिजाबाई भ्र. नारायण माने, वय ६० वर्ष धंदा-घरकाम रा.हावरगा ता. जळकोट जि.लातूर.

८) पद्मीनबाई त्र.माधव पवार, वय ५६ वर्ष धंदा-घरकाम रा. हंगरगा ता.अहमदपूर जि. लातूर.

९) सौ. मंगलबाई भ्र. माधवराव जाधव, वय ५१ वर्ष धंदा-घरकाम रा.पाटोदा (बु.) ता.जळकोट जि. लातूर.

वरील अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहू मयत लक्ष्मण पि.गंगाराम सुर्यवंशी रा. येलदरा ता. जळकोट यांचे वारस प्रमाणपत्र मिळावे असे अर्ज केला आहे. त्या पेक्षा सदरहु अर्जदार सदरहु मयताचे कायदेशिर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखे पासून १ महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती बजावाव्यात आणि हया लेखावरून, असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्यल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत लक्ष्मण पि. गंगाराम सुर्यवंशी रा.येलदरा ता. जळकोट यांचे कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज दि. २७/२/२०२४ रोजी सही व शिक्यानिशी दिले.

पु.ने. ता.३/४/२०२४

कनिष्ठ लिपीक,
दिवाणी न्यायालय
क.स्तर. अहमदपूर

संहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर.
अहमदपूर

# देगलूर महाविद्यालयाची शितल बनली गटविकास अधिकारी

देगलूर(प्रतिनीधी):- अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी कु. शीतल गोविंदराव हिवराळे ही विद्यार्थीनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (चझडउ) आयोजित केलेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये आपली गुणवत्ता सिध्द केली आहे.



तीची गुणवत्तेनुसार गटविकास अधिकारी Block Development Officer या पदावर निवड झाली आहे.

शीतल हिवराळे ने प्राप्त केलेल्या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे. देवेंन्द्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार,प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. ऊतमकुमार कांबळे , प्रसिद्धीप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, आमचे अशिल नामे शिवाजी त्र्यंबकराव पोतदार रा.उदगीर ता.उदगीर जि. लातूर यांनी अधिकृत केले वरून व माहिती दिलेवरून सदर जाहीर प्रगटन देत आहे.

आमचे अशिल यांनी मौजे तोगरी ता. उदगीर जि. लातूर येथील जमीन सर्वे नं. २६८ मधील क्षेत्र ० हे ३२ आर जमीन ज्याची चतुःर्सिमा :

पुर्वेस--लक्ष्मण लालू वाघमारे याची जमीन

पश्चिमेस--नांदेड बिदर रस्ता

दक्षिणेस--शिवाजी पोतदार यांची जमीन

उत्तरेस--प्रदिप रमेश तोगरीकर यांची जमीन

सदर मिळकत आमचे अशिल अनिल पि. लक्ष्मण तोगरीकर रा.तोगरी ता.उदगीर यांचेकडून खरेदी करणे बाबत व्यवहार केला असून त्याबाबत दिनांक ०६/११/२०२३ रोजी लेखी करारपत्र/ठरावपत्र दोघामध्ये झाले असून खरेदीखत करारातील ठरलेल्या अटी व मुदतीत करून द्यावयाचे व घ्यावयाचे ठरले आहे. तरी सदर खरेदी, विक्रीचे व्यवहाराबाबत कोणाची उजर अथवा तक्रार असल्यास कागदोपत्री पुराव्यासोबत जाहीर प्रगटनाचे प्रगटनापासून १५ दिवसाचे आत संपर्क साधावा अन्यथा आमचे अशिल खरेदीखत करून घेतील याची नोंद घ्यावी.

दिनांक २२/०३/२०२४
जाहिर प्रगटन हेणार

शिवार्जी त्र्यंबकराव पोतदार
रा.उदगीर ता.उदगीर जि.लातूर

तर्फे :
व्ही.ए.दिक्षीत,
ॲडव्होकेट, उदगीर
मो.नं. ९८२२५५६११८

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि.

दि.२९/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार उमाकांत रामन्ना बिरादार रा.रावणगाव ता. उदगीर यांचा नातू सुशांत सुरेश बिरादार यांचा जन्म दिनांक १७/०१/२००९ रोजी मौजे रावणगाव ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार उमाकांत रामन्ना बिरादार रा.रावणगाव ता. उदगीर यांनी त्यांचा नातू यांचा जन्म दिनांक १७/०१/२००९ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २७/०२/२०२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा नातू यांचा जन्म दिनांक १७/०१/२००९ रोजी या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे उमाकांत रामन्ना बिरादार रा.रावणगाव ता.उदगीर यांचा नातू सुशांत सुरेश बिरादार यांचा जन्म दिनांक १७/०१/२००९ रोजीची नोंद ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय रावणगाव ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज २९/०२/२०२४:रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ३१/०३/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार उदगीर**

## महापूर येथे विशेष शिबीराचे आयोजन

लातूर: वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूरचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौजे महापूर ता. लातूर येथे दिनांक २० ते २६ मार्च या कालावधीत आयोजीत केले आहे.

या शिबिरात ग्राम स्वच्छता, माध्यम युवक युवती सुसंवाद, शास्त्रज्ञ शेतकरी सुसंवाद, श्रम संस्कार, शेतकरी मेळावा, महिला मेळावा, कवी संमेलन, आरोग्य शिबीर, पशुरोग निदान व उपचार शिबीर व शेतीपूरक उद्योग व्यवसाय यासंबंधी मार्गदर्शन होणार आहे. शिबीराचे उद्घाटन संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. उदय खोडके यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, डॉ. बाबासाहेब ठोंबरे, डॉ. रणजित चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

## जाहीरनामा

**जाहीरनामा**

जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि.

दि.१९/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार सुनंदा व्यंकट जाधव रा.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/१२/१९७९ रोजी मौजे नेत्रगाव ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरिल अर्जदार सुनंदा व्यंकट जाधव रा.उदगीर ता.उदगीर त्यांचा यांचा जन्म दिनांक ०५/१२/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दि.११/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५/१२/१९७९ रोजी या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार सुनंदा व्यंकट जाधव रा.उदगीरायांचा जन्म दिनांक ०५/१२/१९७९ रोजीची नोंद उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज - १९/०३/२०२४:रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख--२० /०४/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार उदगीर**

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी. आर. झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०८/२०२४
